रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ८४ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## ‘लाडकी बहीण’मुळे सरकारची डोकेदुखी

**मुंबई :** राज्य सरकारच्या ‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना’ अंतर्गत २६.३ लाख अपात्र महिलांना तब्बल ५१०० कोटी रुपये वितरित झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. प्रत्येक पात्र महिलेने दरमहा १५०० रुपये मिळवण्याची ही योजना सत्ताधारी पक्षाच्या निवडणूक यशाचे प्रमुख कारण ठरली. परंतु, नुकत्याच झालेल्या तपासणीत योजनेतील गंभीर अनियमितता उघड झाल्या असून, यामुळे योजनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. योजनेतील अनियमिततेचा पर्दाफाश राज्याच्या माहिती तंत्रज्ञान (आयटी) विभागाने केलेल्या तपासणीत २६.३ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले.


# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५

किंमत ४ ₹












### खेळाडूंना दिलेले आश्वासन फेल

# क्रीडा अधिकाऱ्यांचा ‘खेळ’

- विजेत्यांना रोख बक्षिसांचे फक्त आश्वासन
- प्रत्यक्षात बक्षीस वितरण करताना फसवणूक

प्रमोद जाधव

। रायगड ।

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत मॅरेथॉन स्पर्धा अलिबागमध्ये आयोजित करण्यात आली होती. जिल्हाभरातून जवळपास शंभरहून अधिक स्पर्धेत स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख स्वरुपात बक्षीस देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु, क्रीडा अधिकाऱ्यांकडून विजेत्या खेळाडूंची घोर फसवणूक करण्यात आली असल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली आहे.

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळाचे महत्त्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक-युवतींमध्ये क्रीडाविषयक वातावरण तयार व्हावे, तसेच क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे या हेतूने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शुक्रवारी (दि.२९) सकाळी अलिबागमध्ये मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. पान २ वर

#### पूर्णवेळ क्रीडा अधिकाऱ्यांचा अभाव

जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून रवींद्र नाईक हे कार्यरत होते. त्यांच्या जागी माणगावचे तालुका क्रीडा अधिकारी यांच्याकडे जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला. त्यानंतर आता त्या पदावरून त्यांना काढून त्यांच्या जागी पेणचे तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्याकडे अतिरिक्त कारभार एप्रिल महिन्यापासून सोपविण्यात आला आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी पूर्णवेळ जिल्हा क्रीडा अधिकारी यांची नियुक्ती न केल्याने त्यांच्या जागी तालुका क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत क्रीडा विभागाचे कामकाज चालविले जात आहे. जिल्ह्याला गेल्या अनेक महिन्यांपासून पूर्णवेळ क्रीडा अधिकारी नाहीत, ही मोठी चिंतेची बाब आहे.



#### तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची फक्त तीन पदे मंजूर

प्रकाश वाघ यांच्याकडे पेणचे तालुका क्रीडा अधिकारी म्हणून कारभार आहे. त्यांच्याकडे पेणबरोबरच पनवेल, उरण, खालापूर, कर्जत, म्हसळा, श्रीवर्धन या सहा तालुक्यांचा क्रीडा अधिकारी तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून अतिरिक्त कारभार आहे. रोहा तालुका अधिकारी म्हणून अंकिता मयेकर या कार्यरत आहेत. त्यांच्याकडे रोहासह अलिबाग व मुरूड तालुक्याचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला आहे. तसेच राजेंद्र अतनुर यांच्याकडे माणगावचे तालुका क्रीडा अधिकारी म्हणून कारभार असून, सध्या महाड, पोलादपूरचे तालुका क्रीडा अधिकारी म्हणून अतिरिक्त भार त्यांच्याकडे आहे. त्यामुळे तीन तालुका अधिकारी जिल्ह्यात कार्यरत असून, १२ पदे रिक्त असल्याची माहिती समोर येत आहे.

> राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त अलिबागमध्ये मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी शंभरहून अधिक खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. सुरुवातीला जाहिरातीत रोखीत बक्षीस ठेवण्यात आले होते. मात्र, त्यामध्ये सुधारणा करून रोखीत बक्षीस देण्याचा मुद्दा काढण्यात आला. ती जाहिरात खेळाडूने पाहिली नसल्याने त्यांना गैरसमज निर्माण झाला. रोखीत बक्षीस देण्याबाबत कोणतीही आर्थिक फसवणूक झाली नाही.
>
> – प्रकाश वाघ, प्रभारी जिल्हा क्रीडा अधिकारी

## आरक्षणासाठी एल्गार

### जरांगेंचे आझाद मैदानावर आंदोलन

। मुंबई । प्रतिनिधी ।

मराठा आंदोलकांचे नेते मनोज जरांगेंच्या नेतृत्वाखाली मराठा बांधवांनी आरक्षणासाठी पुन्हा एकदा एल्गार पुकारला असून, मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले आहे. काहीही झालं तरी आम्ही मराठा आरक्षण घेतल्याशिवाय येथून जाणार नाही, अशी भूमिका जरांगे यांनी घेतली आहे. तर, दुसरीकडे त्यांना पाठिंबा देण्यासाठी हजारो मराठा आंदोलक मुंबईत पोहोचले आहेत. एकीकडे मुंबईत पाऊस चालू झाला आहे,



तर दुसरीकडे मराठा आंदोलक आझाद मैदानात ठाण मांडून आहेत. दरम्यान, एकीकडे मुंबईत मराठा आंदोलन चालू असताना, दुसरीकडे कायदा व सुव्यवस्था कायम राखली जावी म्हणून जरांगे यांनी मोठा आदेश दिला आहे. त्यांनी सीएसटीवरील पान २ वर

## दिबा समर्थक आक्रमक

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई एअरपोर्ट अदानी गेटवर शुक्रवारी दिबा समर्थक भूमीपुत्र विजय शिरढोणकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो प्रकल्पग्रस्त स्थानिक ग्रामस्थांनी प्रचंड आक्रोश व असंतोष व्यक्त करत विमानतळ प्राधिकरण विभागाचे लक्ष वेधले.

लोकनेते दिबा समर्थकांच्या योद्ध्यांनी ऐन सणासुदीच्या काळात भरपावसात नोकर भरतीच्या प्रक्रियेतील पान २ वर

## पालीत पाच वर्षांत चौथा नगराध्यक्ष

। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील पाली नगरपंचायतीत पुन्हा एकदा राजकीय उलथापालथ होत असून, अवघ्या पाच वर्षांत चौथ्या नगराध्यक्षाची निवड होणार आहे. नगराध्यक्षपदावर सतत होणारे बदल हे पालीच्या विकासकामांसाठी घातक ठरले आहेत. पवित्र बल्लालेश्वराच्या नगरीत नागरिकांना आजही अशुद्ध पाणी प्यावे लागत आहे, फिल्टर पाणी योजना कागदावरच धूळ खात पडली आहे, तर राजकारणी मात्र फक्त खुर्चीच्या कुरघोड्यांत व्यस्त असल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

पाली नगरपंचायतीत एकूण १७ सदस्य असून २ सदस्य बाद झाले आहेत. सध्याची ताकद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ५, शिवसेना (शिंदे गट) ५, भाजप ४ आणि शेकाप १ अशी आहे. राज्यस्तरीय पातळीवर भाजप-शिंदे गट-अजित पवार पान २ वर

## नाना पाटील यांना अभिवादन



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेतकरी, कामगार व मागासवर्गीय घटकाच्या न्याय्य हक्कासाठी लढा देणारे, रायगडचे भाग्यविधाते नारायण नागू पाटील यांची शुक्रवारी (दि.२९) जयंती जिल्ह्यात साजरी करण्यात आली. अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहासह जिल्ह्यातील तालुकास्तरावर ठिकठिकाणी जयंती साजरी करून त्यांच्या प्रतिमेस व पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

अलिबागमधील शेतकरी भवन येथील सभागृहात शेकापच्या वतीने नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते मानकर, अशोक प्रधान, विनोद पाटील, संदीप सारंग आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंच, प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमधील रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात जयंती साजरी करण्यात आली. नारायण नागू पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात तालुका चिटणीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## महिलांसाठी मुंबई सुरक्षित

। मुंबई । प्रतिनिधी ।

देशात दररोज महिलांवरील हिंसाचार, गुन्हे आणि हत्येच्या बातम्या समोर येतात. दरम्यान, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी नुकताच महिला सुरक्षेवरील राष्ट्रीय वार्षिक अहवाल जाहीर केला आहे. यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. अहवालानुसार, देशाच्या शहरी भागातील ४० टक्के महिलांना असुरक्षितता वाटते. या अहवालासाठी ३१ शहरांमधील १२,७७० महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले. गेल्या काही दिवसांत अशा अनेक हृदयद्रावक घटना समोर आल्या आहेत, ज्यामुळे पालकांची चिंता आणखी वाढली आहे. देशाचा एकूण सुरक्षा निर्देशांक ६५ टक्के पान २ वर

### रायगड जिल्ह्यात स्वच्छ सर्वेक्षण अभियान फेल

## गावांच्या वेशीवरच कचऱ्याचा ढिगारा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये ग्रामीण स्वच्छ सर्वेक्षण अभियान जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आले. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना स्वच्छता राखण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या. परंतु, हे अभियानच फेल ठरल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील गावांच्या वेशीवरच कचऱ्याचा ढिगारा अस्ताव्यस्त पडलेला असून, ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्याकडे मात्र स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.



केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत स्वच्छता सर्वेक्षण ग्रामीण २०२५ हा उपक्रम रायगड जिल्ह्यात सुरु करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी गाव पातळीवरील प्रशासनाला या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यानुसार जिल्ह्यात हालचाली सुरु झाल्या. केंद्रीय पेयजल व पान २ वर

### गणेशभक्तांचे आर्थिक गणित बिघडले | बाप्पांचे मोदक, खिरापतही महागली

## ऐन गणेशोत्सवात महागाईचा ‘नारळ’

निलेश फुंडे

। रेवदंडा ।

नारळाच्या झाडांची घटती संख्या, पावसाळ्यात नारळ खराब होत त्यांना कीड लागली आहे. त्यामुळे नारळाचे उत्पादन कमी झाले आहे. परिणामी, गणेशोत्सवामुळे नारळाची मागणी जास्त आणि आवक कमी असल्याने भाव दहा ते पंधरा रुपयांनी वाढले आहेत. तसेच सुके खोबऱ्याची किंमत ५०० ते ७०० रुपये किलोपर्यंत गेल्याने ऐन गणेशोत्सवात ग्राहकांना महागाईचा फटका बसत आहे.

गणेशोत्सवात प्रसाद, देवपूजा, मिठाई, मोदक या पदार्थांसाठी नारळ खोबऱ्याची मोठी मागणी असते. मात्र, नारळाच्या झाडांची घटती संख्या, नारळाला लागणाऱ्या कीडरोगामुळे घटलेले उत्पादन आणि नारळाचे बागायतदार आपली वाडी शहाळ्यांच्या विक्रीसाठी व्यापाऱ्यांना कराराने देत असल्याने नारळांची संख्या घटली आहे. परिणामी, नारळाची आवक कमी झाली आहे. त्यामुळे नारळांचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

गेल्या काही दिवसांत नारळाच्या किमतींमध्ये पान २ वर

#### झाडांची घट आणि शहरीकरण

पूर्वी कोकणात प्रत्येक घरासमोर नारळाचे झाड हे अभिमानाचे मानले जात होते. पण वाढते शहरीकरण, सिमेंटची घरं, बांधकामांची झपाट्याने होत असलेली वाढ यामुळे नारळाची झाडं कमी होत चालली आहेत. परिणामी, बाजारात मागणी पुरवठ्याचे प्रमाण बिघडले असून, त्याचा फटका भाववाढीच्या रूपाने जनतेला बसत आहे.

#### दहा ते पंधरा रुपयांनी भाववाढ



#### जनतेत चर्चेचा विषय

सणासुदीच्या काळात नारळ महाग झाल्याने बाजारपेठेत व नागरिकांमध्ये नारळाच्या किमतींबाबत चर्चेला उधाण आले आहे. गणपती बाप्पाच्या नैवेद्यासाठी नारळ घ्यावाच लागतो, किंमत कितीही असो, अशी श्रद्धाळू भाविकांची भूमिका आहे. पण, सर्वसामान्य कुटुंबांना मात्र या भाववाढीची झळ प्रकर्षाने जाणवत आहे.

## पालिकेच्या तिजोरीत लाखोंची भर

### लाखो मालमत्ताधारकांनी भरला तब्बल ४८३ कोटींची कर

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पालिकेच्या मालमत्ता कर विभागाला यावर्षी कर वसुलीत उल्लेखनीय यश मिळाले आहे. १ एप्रिल ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण १ लाख ३६ हजार ९६७ मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला असून, त्यातून तब्बल ४८३.०८ कोटींची वसुली करण्यात आली असल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.

पालिकेकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, १८ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत ‘अभय योजने’अंतर्गत ७८ हजार ४५ करदात्यांनी मालमत्ता कर भरून २५२.४४ कोटींचे उत्पन्न महापालिकेला दिले आहे. मागील आर्थिक वर्षातील एकूण मालमत्ता करवसुली ही ४२४.७८ कोटी झाली होती. त्या तुलनेत यावर्षी ऑगस्ट महिन्यातच ४८३.०८ कोटींची विक्रमी वसुली पान २ वर



> पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC Tax App आणि Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तात्काळ भरावा.
>
> – स्वरूप खारगे, उपायुक्त

#### कर-मित्र चॅटबॉटचे लोकार्पण

नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने ‘कर-मित्र’ चॅटबॉटचे नुकतेच लोकार्पण केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.

# खासगी शिक्षकांचे पगार रखडले

## • वेतन पथकात कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची मागणी

। खरोशी । प्रतिनिधी ।

मागील दोन-चार महिन्यांपासून रायगड जिल्हा खासगी प्राथमिक शाळांचे शिक्षकांचे पगार एक-एक महिना उशीर होत असल्याने सर्व शिक्षक बांधवांमध्ये नाराजीचा सूर निर्माण झाला आहे. शासनाच्या शिक्षण विभागाकडून रायगड जिल्ह्यातील खासगी प्राथमिक शाळांसाठी वेतन व भविष्य निर्वाह निधीची कामे पूर्ण करण्यासाठी असलेल्या वेतन पथकात फक्त एकच कर्मचारी काम करीत असल्याने शाळांची कामे वेळेवर होत नाहीत. शिक्षण उपसंचालक यांच्याकडे संघटनेने मागणी करूनसुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवली जात नसल्याने शाळांनी संताप व्यक्त केला आहे.



रायगड जिल्ह्यातील खासगी प्राथमिक शाळा एकूण ६७ आहेत. यामध्ये तब्बल ५०० पर्यंत शिक्षक, शिक्षकेतर, मुख्याध्यापक, कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या पगाराची बिले, भविष्य निर्वाह निधीच्या स्लिप तसेच विविध अन्य शिक्षकांच्या पगारासंबंधीची कामे पूर्ण केली जातात. मे महिन्यामध्ये शिक्षणाधिकारी आणि वेतन अधीक्षक यांची बदली झाल्यामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व खासगी प्राथमिक शाळांच्या शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत. परंतु, प्राथमिक शाळांसाठी असलेल्या वेतन पथकात फक्त एकच कर्मचारी उपलब्ध असल्याने त्यांच्यावर पूर्ण कार्यालयाचा भार आलेला आहे. या कार्यालयात पूर्वी अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, दोन सहाय्यक लिपिकांची पदे मंजूर आहेत. शासनाने पूर्वी ही पदे भरलेली होती. परंतु, सद्यः स्थितीमध्ये एकच कर्मचारी कामाचा डोंगर खांद्यावर घेऊन शिक्षकांची शाळांची कामे पूर्ण करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे. याबाबत रायगड जिल्हा खासगी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने विभागीय सहाय्यक शिक्षण उपसंचालक सुनील सावंत यांची भेट घेऊन वेतन पथकामध्ये ज्यादा कर्मचारी देण्याची मागणी केली होती. परंतु, अद्यापपर्यंत कर्मचाऱ्यांचा खडखडाट झाल्याने शाळांची सर्वच कामे विलंबाने होत आहेत. तीन वर्षांच्या भविष्य निर्वाह निधीच्या स्लिपा अद्यापपर्यंत मिळालेल्या नाहीत. वेतन पथकाला कायमस्वरूपी अधीक्षक उपलब्ध होत नाहीत. जून महिन्याचा पगार २८ जुलैला झाला, तर जुलै महिन्याचा पगार २६ ऑगस्ट रोजी झाला. ऑगस्ट महिन्याचा पगार हा गणपतीच्या सुट्टीच्या अगोदर होणे आवश्यक होता. मात्र, गणपतीची सुट्टी आता संपत आली. त्यामुळे ऑगस्ट महिन्याचा पगार हा सप्टेंबरमध्ये कधी होईल याची शाश्वती नसल्याची नाराजी शिक्षक बांधवांनी व्यक्त केली आहे.

अनेक बांधवांनी घर खरेदी, गाड्या खरेदी केल्या आहेत. त्यांचे हप्ते वेळेवर जात नाहीत. त्याचबरोबर मुलांच्या शिक्षणासाठी फी द्यावी लागत आहे. मात्र, पगारच वेळेवर होत नसल्यामुळे अनेक शिक्षक बांधवांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. कर्जाचे हप्ते नियमित न केल्याने चक्रवाढ व्याजाच्या दंडाचा दणकाही कर्मचाऱ्यांना बसत आहे. याकामी शिक्षण उपसंचालक यांनी तात्काळ वेतन खात्यामधील कर्मचाऱ्यांची कमतरता दूर करावी आणि कायमस्वरूपी वेतन खात्यामध्ये कर्मचारी द्यावेत, अशी मागणीही आता शिक्षकांनी केली आहे. रायगड जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी विशेष लक्ष देऊन वेतन खात्यातील त्रुटी दूर कराव्यात आणि शिक्षक बांधवांचा पगार एक तारखेला कसा होईल यासाठी लक्ष द्यावे, अशी मागणी रायगड जिल्हा खासगी प्राथमिक शाळा संघटनेनी केली आहे.

> **शासनाने वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांची ६०० पदे आहेत. यापैकी फक्त १०० पदे शासनाने भरलेली आहेत. अनेक ठिकाणी रिक्त पदांमध्ये कर्मचारी भरले नसल्याने कर्मचाऱ्यांच्या कमतरतेची स्थिती निर्माण होत आहे. शासनाने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन पदे भरली पाहिजेत. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये गटशिक्षणाधिकारीही नेमलेले नाहीत. त्याचाही कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे. त्यामुळे पदांची कमतरता ही सर्वच बाबतीमध्ये आहे. लवकरात लवकर एका लिपिकाची नियुक्ती निश्चितच खासगी प्राथमिक वेतन पथकामध्ये केली जाईल असे सांगितले.**
>
> **– सुनील सावंत, शिक्षण सहाय्यक उपसंचालक**

# धोकवडेत बापलेकाचे निधन

। अलिबाग । प्रतिनिधी ।





अलिबाग तालुक्यातील धोकवडे येथील बापलेकाचे निधन झाले. या निधनाने धोकवडे गावात शोककळा पसरली आहे.

धोकवडे येथील नारायण रामभाऊ म्हात्रे यांचे महिन्याभरापूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा विनायक नारायण म्हात्रे यांचे वयाच्या ५० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. एकाच कुटुंबातील बापलेकाचे निधन झाल्याने म्हात्रे कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. नारायण म्हात्रे हे शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. पक्षवाढीसाठी त्यांचे मोलाचे योगदान होते.


## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. निलेश प्रकाश चव्हाण, २. श्री.सचिन प्रकाश चव्हाण यांनी मौजे अंजप, ता.कर्जत जि. रायगड, येथील जमीन मिळकतीचे मालक श्री. भाऊ विष्णू म्हसे यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे अंजप, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीची**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| अंजप | ४५/१/ब | ०.५४.०० पो.ख. ०.०५.०० एकूण ०.५९.०० या एकूण क्षेत्रापैकी विकत दिलेले ०.२०.०० गुंठे क्षेत्र १.श्री.निलेश प्रकाश चव्हाण, २.श्री.सचिन प्रकाश चव्हाण यांना विकत दिलेले आहे. | १.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, २१ (एकवीस) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत दि. ३०/०८/२०२५

कळावे

**ॲड. संदिप मारूती घरत**

ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.

मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८


# सभासदांचा विश्वासच हीच खरी ताकद : वागळे

## • यशोधन सहकारी पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

यशोधन सहकारी पतसंस्थेला तब्बल ४४ लाखांचा नफा मिळाला आहे. हा नफा फक्त आकड्यांचा नाही, तर आपल्या एकतेचा विजय आहे. सभासदांचा विश्वास हीच खरी ताकद आहे, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेला तब्बल ४४ लाख ४५ हजारांचा निव्वळ नफा झाला असून, मागील शिल्लक धरून संस्थेकडे एकूण ४४ लाख ४९ हजार रुपये शिल्लक राहिल्याची माहिती यशोधन नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष शेखर वागळे यांनी दिली. अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉलमध्ये झालेल्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्यावेळी ते बोलत होते.

शेखर वागळे म्हणाले की, ठेवींच्या बाबतीतही संस्थेने मोठी झेप घेतली आहे. गतवर्षीच्या १२ कोटी ९ लाख रुपयांच्या तुलनेत यावर्षी ठेवी वाढून थेट १३ कोटी ६ लाखांवर पोहोचल्या आहेत. म्हणजेच तब्बल ९७ लाख रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे. हा आकडा माझा नसून तो सभासदांच्या विश्वासाचा आहे, असे वागळे यांनी गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमात संस्थेचे ऑडिटर संदीप गोठीवरेकर यांनी संस्थेचे व्यवहार पूर्णपणे पारदर्शक असून, ठेवीदारांचे पैसे शंभर टक्के सुरक्षित असल्याचा विश्वास दिला. कायदेशीर सल्लागार ॲड. किरण कोसमकर यांनीही संस्थेच्या प्रगतीविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर साळे यांनी डिजिटल अरेस्ट, हनी ट्रॅप आणि सायबर क्राईमविषयक जनजागृती केली. नागरिकांनी सजग राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.दरम्यान, कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात काम करणारे दादा क्लासेसचे दादा वारीसे व मारोती भगत यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पदाधिकारी, सभासद, ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरोग्य निदान शिबिराचे आयोजन

। नागोठणे । प्रतिनिधी ।

भटके विमुक्त दिनानिमित्ताने नागोठण्यातील डॉ. नेल्सन मंडेला आश्रम शाळेत ३१ ऑगस्ट रोजी आरोग्य निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध कॅन्सर तज्ज्ञ डॉ. प्रणिता डोंगरगावकर, मधुमेह व हृदयविकार तज्ज्ञ डॉ. कपिल चावरे, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. शुभांशू भालादरे आणि नागोठणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य शिरसाट यांना आरोग्य शिबिरात निमंत्रित करण्यात आले आहे. हे रोगनिदान शिबीर सर्वांसाठी खुले आणि निःशुल्क असल्याने या शिबिराचा नागोठण्यातील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

यावेळी भटक्या-विमुक्त जाती जमातीच्या संवर्गाच्या सामाजिक आणि शैक्षणिक समस्या आणि संविधानिक तरतुदी व भवितव्य या विषयावर व्याख्यान होणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, श्री. कांचन चिंतामन ओझे यांच्या ताबेकब्जातील, वहीवाटीतील, त्यांच्या मालकी हक्कात असलेल्या खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेल्या शेतजमीनी आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करणेचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू शेतजमीनींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**शेतजमीन मिळकतींचे वर्णन**

**मौजे शिरढोण, तहसिल पनवेल, जिल्हा रायगड येथील**

| भूमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.चौ.मी. | क्षेत्र: पोट खराबा हे.आर.चौ.मी. | क्षेत्र: एकूण हे.आर.चौ.मी. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| ३७३ | १ | ०-१४-०० | ०-००-०० | ०-१४-०० | ०.२८ |
| ३७३ | ३ | ०-२२-०० | ०-००-०० | ०-२२-०० | ०.४७ |
| ३७३ | ७ | ०-१३-०० | ०-००-०० | ०-१३-०० | ०.७५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीनींचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा वहीवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिनी निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : /०८/२०२५

**ॲड. अतुल तुकाराम भोपी**

कार्यालय :- बी/८, माणेक नगर को-ऑप. हौ. सोसायटी, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६.

मो.नं. ९३२४६७९५०७


पान १ वरुन

## क्रीडा अधिकाऱ्यांचा 'खेळ'

१५ व १७ वर्षांखालील मुले व मुली, खुला गट पुरुष व महिला वयोगटासाठी तीन किलोमीटर धावण्याची ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत विजेत्या ठरणाऱ्या खेळाडूंना तीन हजार, दोन हजार व एक हजार असे रोखीत बक्षीस ठेवण्यात आले होते. त्याची जाहिरातही सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आली होती. रोखीत बक्षीस मिळणार म्हणून जिल्हाभरातून शंभरहून अधिक खेळाडू या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते. यातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडूंना चषक देऊन गौरविण्यात आले. परंतु, रोखीत बक्षीस देण्यात आले नाही. त्यामुळे विजेत्या खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना जाब विचारला. मात्र, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत खेळाडूंशी बोलणे टाळले. क्रीडा अधिकाऱ्यांकडून खेळाडूंची हेळसांड होण्याबरोबरच फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तीन गटातील एकूण १८ विजेत्यांची फसवणूक झाल्याचे बोलले जात आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या या प्रकाराबाबत नाराजीचे सूर उमटत आहेत.

## महिलांसाठी मुंबई सुरक्षित

इतका नोंदला गेला असून, शहरांचे मूल्यमापन 'अत्यंत चांगले', 'चांगले', 'कमी', 'अत्यंत कमी' अशा श्रेणींमध्ये करण्यात आले. सर्वेक्षणानुसार, मुंबई, कोहिमा, विशाखापट्टणम, भुवनेश्वर, ऐझॉल, गंगटोक आणि इटानगर ही शहरे महिलांसाठी सर्वात सुरक्षित ठरली आहेत. याउलट, पाटणा, जयपूर, फरिदाबाद, दिल्ली, कोलकाता, श्रीनगर आणि रांची ही शहरे सर्वात कमी सुरक्षित असल्याचे दिसून आले आहे. दिल्ली आणि फरीदाबाद हे पहिल्या पाच असुरक्षित शहरांमध्ये आहेत, जिथे जवळजवळ ४२ टक्के महिलांनी असुरक्षित असल्याचे मत नोंदवले. रांचीमध्ये हा आकडा आणखी जास्त आहे तिथे ४४ टक्के महिलांनी असुरक्षित असल्याचे सांगितले. ईशान्य भारतातील कोहिमा शहरात ८० टक्क्यांपेक्षा जास्त महिलांनी सुरक्षितेची भावना बोलून दाखवली. या शहरने देशातील महिलांसाठी सर्वात सुरक्षित ठिकाण म्हणून अव्वल स्थान मिळवले आहे. तर विशाखापट्टणम, भुवनेश्वर, ऐझॉल, गंगटोक, इटानगर आणि मुंबई येथे जवळजवळ ७० टक्के महिलांनी सुरक्षित असल्याचा अनुभव व्यक्त केला.

## गणेशोत्सवात महागाईचा 'नारळ'

लक्षणीय वाढ झाली असून, छोटा नारळ आता ४५ ते ५० रुपयांपर्यंत, तर मोठा नारळ तब्बल ६५ ते ७५ रुपयांना विकला जात आहे. सणासुदीपूर्वी हेच दर अनुक्रमे ३५ ते ४० व ५० ते ६० रुपये होते. एवढेच नाही तर, सुके खोबरेसुद्धा ५०० ते ७०० रुपये किलो या भावाने विकले जात असून, सामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे.

कोकणात नारळाशिवाय जेवणाची कल्पनाच करणे कठीण आहे. घराघरांत रोजच्या स्वयंपाकात नारळाचा वापर होतोच. त्याचबरोबर सणासुदीच्या दिवसांत मोदक, नारळाच्या मिठाया, नारळी पाक, विविध भाजीपाला व पदार्थांमध्ये नारळ हा मुख्य घटक ठरतो. गणपती बाप्पाला नैवेद्य अर्पण करतानासुद्धा नारळ अपरिहार्य आहे. मंदिरांत श्रीफळ म्हणून नारळाचा वापर होत असतो. पुढे येणाऱ्या नवरात्रोत्सवातही नारळाची मागणी वाढणार असल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

## आरक्षणासाठी एल्गार

मराठा आंदोलकांचा उल्लेख करून हा आदेश दिला आहे.

दरम्यान, मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांना प्रशासनाकडून आंदोलनासाठी एक दिवसाची मुदतवाढ मिळाल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर गंभीर आरोप केले. आझाद मैदानावर आलेली आंदोलक वैतागून निघून जावीत यासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सरकारने बंद केली, शौचालये बंद केली, चहा आणि नाश्त्याची दुकाने तसेच जेवणाची हॉटेल बंद ठेवली, असा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी सरकारवर सडकून टीका केली.

सरकारने काय केलं ते मला माहीत नाही. त्यांनी काल परवानगी दिली, आज दिली, आणखी आता उद्याची दिली. माझं म्हणणं आहे, हे असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा सरकारने असली डाव खेळावा आणि मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावं. मराठ्यांचं मनं जिंकणं गरजेचं आहे. मी सकाळीसुद्धा तेच सांगितलं आणि आता सुद्धा तेच सांगतोय. सरकारला आता अशी योग्य संधी आहे, गोरगरिबांची मनं जिंकण्याची योग्य वेळ आहे. सरकारला सगळे विसरतील पण गोरगरीब मराठे विसरणार नाहीत, जर त्यांनी गोरगरीब मराठ्यांना आरक्षण दिलं. माझा मरेपर्यंत गरीब मराठा विसरणार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.

## पालीत पाच वर्षांत चौथा नगराध्यक्ष

गट अशी महायुती एकत्र असली तरी पाली नगरपंचायतीत मात्र एकी साधली नसल्याने तिरंगी लढत होणार, हे निश्चित झाले आहे.

या पदासाठी कल्याणी संदीप दपके शिवसेना (शिंदे गट), नलिनी गणेश म्हात्रे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), पराग विजय मेहता भारतीय जनता पार्टी हे तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. २०२२ मध्ये स्थापन झालेल्या पाली नगरपंचायतीच्या प्रथम नगराध्यक्षा गीता ताई पालरेचा होत्या. त्यांच्या राजीनाम्यानंतर प्रणाली शेळके नगराध्यक्षा झाल्या. मात्र पक्षांतर्गत कारवाईनंतर प्रभारी म्हणून आरिफ मणियार यांची नियुक्ती झाली. आणि आता १० सप्टेंबर रोजी विशेष सभेत चौथ्या नगराध्यक्षाची निवड होणार आहे.

## दिबा समर्थक आक्रमक

पहिल्या टप्प्यावर आक्षेप घेत जोरदार घोषणाबाजी करत नवी मुंबई विमानतळ कार्यालयाच्या ठिकाणी मोठा जमाव केला होता. यावेळी आमचा उद्देश भूमीपुत्रांना न्याय देणे आहे, आम्हाला आमचं स्वार्थ नाही असे म्हणत प्रलंबित व विलंब होत असलेल्या नोकर भरती, नामकरण मुद्द्यावर सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करत भाजप पक्षाचा राजीनामा देणारे दिबा कट्टर समर्थक विजय शिरढोणकर व अनेक आजी, माजी लोकप्रतिनिधी, स्थानिक भूमीपुत्रांनी यावेळी नोकर भरती प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप होत असून, अशा मुद्द्यांवर छुपे राजकारण होत आहे, असे सांगितले. या विमानतळ प्रकल्पात आमदारांची एक इंचदेखील जमीन गेलेली नाही. भूमीपुत्रांना डावलण्याचा प्रकार कोणी करत असतील, तर दिबांच्या आंदोलनाची पुनरावृत्ती केली जाईल, असा इशारा देण्यात आला.

## गावांच्या वेश्वीवरच कचऱ्याचा ढिगारा

स्वच्छता मंत्रालयाने मान्यता दिलेल्या दिल्ली येथील अकॅडमी फॉर मॅनेजमेंट स्टडी या संस्थेमार्फत अलिबाग, रोहा, कर्जत,पेण, पनवेल, माणगाव, सुधागड, उरण, महाड, म्हसळा, खालापूरमधील गावांना भेटी देण्यात आल्या.

सर्वेक्षणामध्ये गाव पातळीवरील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर, दृश्यमान स्वच्छता, ओला व सुका कचरा विलगीकरण, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, खत खड्डे, प्लास्टिक संकलन व व्यवस्थापन, घरोघरी भेटी, शौचालयाचा नियमित वापर, कचरा व्यवस्थापनाच्या सवयींचा आढावा घेण्यात आला. शाळा, अंगणवाड्या, बाजारपेठा, धार्मिक स्थळे व सार्वजनिक शौचालयांची स्वच्छतादेखील तपासण्यात आली. मात्र, 'नव्याचे नऊ दिवस' या उक्तीप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण अभियानाचा कारभार जिल्ह्यात असल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्यातील गावांच्या वेशीवरच कचऱ्याचे ढिगारे दिसून येत आहेत. रस्त्याच्या दुतर्फा ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे ग्रामीण स्वच्छ सर्वेक्षण अभियान जिल्ह्यात फक्त समितीला दाखविण्यापुरते झाले की काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## पालिकेच्या तिजोरीत लाखोंची भर

करण्यात आली आहे. महापालिकेच्या या उच्चांकी वसुलीमुळे पनवेल महानगरपालिकेच्या विकासकामांना आर्थिक गती मिळणार आहे. नागरिकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्ती माफीसाठी दिलेली मुदत वाढविण्यात आली आहे. दि.१५ सप्टेंबरपर्यंत शास्तीवरती ९० टक्के सूट राहणार आहे. मालमत्ताधारकांना अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच दिनांक ३१ ऑगस्टपर्यंत मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरल्यास यावर्षीच्या मालमत्ता करावर ५ टक्के सूट मिळणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेच्यावतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांनादेखील २ टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.


## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की आम्ही आमच्या अशिल (१) **स्मिता सुरेंद्र जोशी**, (२) **ओंकार सुरेंद्र जोशी**, (३) **ऐश्वर्या मंदार पेंडसे उर्फ ऐश्वर्या सुरेंद्र जोशी** आणि (४) **रजनी धनंजय मोहरीर उर्फ वर्षा लक्ष्मण जोशी** (यापुढे एकत्रितपणे "**मालक**" म्हणून संदर्भित) यांच्याकडून जमीन, जे कृषी जमीन आहे, यापुढे "**सदर जमीन**" म्हणून संदर्भित, तिचा येथे खाली लिहलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या आहे खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर जमिनी किंवा तिच्या कोणत्याही भाग/भागा संबंधी कोणताही दावा जसे की विक्री, देवाण घेवाण, गहाण, ताबा, हमी, भेट, ट्रस्ट, देखभाल, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरार, धारणाधिकार, परवाना किंवा राईट ऑफ प्रिस्क्रीप्शन किंवा प्रिएम्प्शन किंवा कोणताही करार अंतर्गत किंवा इतर मनोरचना किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपात असतील तर त्यांनी कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि / किंवा ईमेल द्वारे kunal.vaidya@kangacompany.com येथे ह्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावा/ आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**

(सदर जमिनीचे वर्णन)

कृषी जमिनीचा सर्व तुकडा आणि हिस्सा ज्याचे गट क्र. १५३ मोजमाप १ हेक्टर्स ५५ आर्स (१५,५०० चौरस मीटर्स) जे मौजे कमरले, तालुका अलिबाग, जिल्हा रायगडे येथे स्थित आणि असलेले आहे.

३० ऑगस्ट, २०२५ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**

सही/-

कुणाल एस. वैद्य

भागीदार

ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स



## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष/सचिव, सुर्योदय को. ऑप.हौ.सोसा; प्लॉट क्र. ०३ सी-टाईप, बिल्डींग नं. १ ते ५ सेक्टर-०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) | ०२ नारळ, ०१ फणस व २० गुलमोहर अशी एकूण २३ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील सूर्योदय को.ऑप.हौ.सोसा; प्लॉट क्र.-०३ सी-टाईप बिल्डींग नं. १ ते ५, सेक्टर-०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) या भूखंडाच्या आवारातील ०२ नारळ, ०१ फणस व २० गुलमोहर अशी एकूण २३ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणे बाधित होत आहेत. |
| २. | अध्यक्ष/सचिव, श्रीयोग को. ऑप.हौ.सोसा; ६५०/५१ अ, सावरकर चौक, ता. पनवेल, जि. रायगड | ०१ नारळ झाड तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील श्री योग को. ऑप. हौ. सोसा., ६५०/५१ अ, सावरकर चौक, ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ नारळ झाड नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३ | श्रीम. श्रृतिका मयुर जोशी, प्लॉट नं. ए ५, ३३+३४+३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, जि. रायगड | ०१ फणस व ०१ जंगली अशी एकूण ०२ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.ए ५, ३३+३४+३५, सेक्टर ६, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०१ फणस व ०१ जंगली अशी एकुण ०२ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-

**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

PMC-PARK/477/2025-PTAD



Date: 29/08/2025

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री. महेश नारायण म्हामुणकर राहणार मु. पो. चौक, ता. खालापुर, जि. रायगड, यांचे ताबेकब्जातील खालील वर्णनाची मिळकत आहे .

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे नढाळ, तालुका खालापुर, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ: हेक्टर | क्षेत्रफळ: आर | आकारणी: रू. | आकारणी: पै. |
|---|---|---|---|---|
| ३४/१ | ०-४०-०० | | १ | २४ |

आमच्या अशिलांच्या असे निदर्शनास आले आहे की, श्री सुदाम शंकर कातकरी व श्री. नारायण लक्ष्मण कातकरी दोघेही रा. नढाळ, पो लोधिवली, ता. खालापुर, जि. रायगड हे आमच्या अशिलांची फसवणुक करण्याच्या दृष्टीने वरील मिळकत संगनमतानी विकण्याचे विचारात असून त्याप्रमाणे त्यांनी त्रयस्थ इसमांशी बोलणी देखील चालू केलेली आहे. वास्तवीक पाहता वरील मिळकतीशी त्यांचा कोणताही संबंध नसुन आमच्या अशिलांची फसवणुक दृष्ट हेतुने ती वरील मिळकत विकण्याचे विचारात आहेत.

तरी तमाम जनतेस जाहीर नोटीस द्वारा कळविण्यात येते की, वरील मिळकती संबंधी कोणताही खरेदी विकीचा व्यवहार श्री. सुदाम शंकर कातकरी व श्री. नारायण लक्ष्मण कातकरी यांच्या सोबत करू नये. कोणताही व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नसुन ते कायदेशीर कारवाईस पात्र राहतील.

**MANDAR MADHUKAR GURAV**
B.A LLB
ADVOCATE HIGH COURT
Address : Shop No.9, MSP Associate, Dharmanath Nagar, Near Bank Of Baroda, Tupgaon-Chowk Road, Tal. Khalapur, Dist. Raigad.
E-mail:- guravm6@gmail.com
Contact no. 8888598911



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

■ मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

■ श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

■ वरसोली, अलिबाग येथे शहरालगत १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत)सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

■ PHARMACIST REQUIRED अलिबागमध्ये कामाला फार्मसिस्ट पाहिजे.अधिक माहितीसाठी संपर्क करा- ९३७०६५३०५८.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जिल्ह्यात दीड दिवसाच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप

**। रायगड । प्रतिनिधी ।**

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'... अशा जयघोषात तसेच ढोल-ताशांच्या गजरात गणेशभक्तांनी जिल्ह्यात ठिकठिकाणी गुरुवारी दीड दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. बुधवारी जिल्हाभरामध्ये गणरायाचे आगमन झाले होते. गणेश विसर्जन शांततेत व्हावे यासाठी पोलिसांनी, तर सुव्यवस्थित व्हावे यासाठी स्थानिक प्रशासनाने जय्यत तयारी केली होती.



## खारी विभागात बाप्पांचा जयघोष

**। खांब । प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पांचे भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थी बुधवार (दि.२७) ऑगस्ट रोजी मोठ्या आनंददायी उत्साही वातावरणामध्ये बाप्पांचे आगमन झाले. दुसऱ्या दिवशी दीड दिवसीय गणपती बाप्पांचे मनोभावे मोठ्या श्रद्धेचे पूजा विधी दर्शन, भजन हरिपाठ, विसर्जन मिरवणुकीत भजन कीर्तन व भक्ती गीतांनी चांगलीच रंगत वाढवली. 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष सर्वत्र निनादत होता, त्यामुळे वातावरण चांगलेच भक्तीमय झाले होते. गुरुवार (दि.२८) ऑगस्ट रोजी सायंकाळी खारी येथील कुंडलिका तीर नदी पात्रात विसर्जन घाट परिसर गणपती बाप्पा मोरया मंगल मूर्ती मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...गणपती बाप्पांच्या जयघोषाने आसमंत दणाणून सोडत मोठ्या आनंदाश्रूने गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

## ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन

**। उरण । प्रतिनिधी ।**



उरण तालुका परिसरातील गुरुवार (दि. २८) ऑगस्ट रोजी दिड दिवसांच्या गणेश मूर्तीचे विसर्जन मोठया प्रमाणात झाले. जोरदार पाऊस सुरु असताना देखील ढोल-ताशे, बॅन्जो, ब्रास बॅण्ड, हलगी, स्पीकरच्या तालावर गणपती मूर्ती भाविकांच्या घरातुन टेम्पो, हातगाड्यामधून विसर्जन स्थळी आले होते. उरण नगर परिषद हद्दीत मुख्याधिकारी तथा प्रशासक समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगर परिषदेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी उत्तम नियोजन व आयोजन केले होते.विशेष म्हणजे विमला तलाव गार्डनमध्ये पर्यावरण पूरक कृत्रिम तलावाचे निर्माण करून अनेक गणेश मूर्तीचे या पर्यावरण पूरक कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले.

उरण पोलीस ठाणे हद्दीत उरण शहरात विमला तलाव गार्डन येथे दरवर्षी प्रमाणे व प्रथा परंपरे प्रमाणे गणेशमूर्तीचे विसर्जन झाले. मोरा पोलीस स्टेशन हद्दीत समुद्रात गणेश मूर्तीचे विसर्जन झाले तर न्हावा शेवा पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिकांनी आपल्या नजीकच्या तलावात तसेच प्रत्येक गावागावात असलेल्या तलावात श्री गणेश मूर्तीचे विसर्जन केले. उरण पोलीस स्टेशन हद्दीतील एक खासगी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व १९१३ खासगी घरगुती गणेश मूर्तीचे विसर्जन झाले. मोरा व न्हावा शेवा पोलीस स्टेशन हद्दीत शेकडो गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. न्हावा शेवा बंदर विभागचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक एच. डी. मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने कोणताही अनुचित प्रकार उरणमध्ये घडला नाही. एकंदरीत मोठ्या उत्साहात, थाटामाटात, शांततेत दिड दिवसांच्या गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले.




**। कोलाड । प्रतिनिधी ।**

कोलाड विभागात दीड दिवसांच्या गणपतींचे गुरुवार (दि.२८) ऑगस्ट रोजी मोठ्या भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले.

विसर्जना दरम्यान ठिकठिकाणी मिरवणूका काढण्यात आल्या. मिरवणुकीत कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कोलाड पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

विसर्जनाच्या दिवशी सायंकाळी पावसाने रिमझिम बरसायला सुरूवात केली. त्यामुळे गणेशभक्तांचा थोडासा हिरमोड झाला होता. तरीही मोठ्या उत्साहात व जल्लोषात वाद्यांच्या गजरात सार्वजनिक तलाव, नाले, नदी पात्रात गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर... या अशी विनवणी करून गणपती बाप्पांचे मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले.

## खांब विभागात भावपूर्ण निरोप

**खांब :** गणेश चतुर्थीच्या दिवशी मोठ्या भक्तीमय वातावरणात घरोघरी आगमन झालेल्या दीड दिवसांच्या गणरायांचे मोठ्या जल्लोषात व भक्तीमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या अशा जयघोष करीत खांब विभागातील तमाम गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पांना निरोप दिला. गणेश चतुर्थीच्या मोठ्या आनंददायी वातावरणात गणरायाची घरोघरी स्थापना केल्यानंतर दीड दिवसात मनोभावे पूजन, भजन, आरती, हरिपाठ, किर्तन, जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमाबरोबरच पुरूषांचे कलगीतुरा नाच तर महिला वर्गाने झिम्मा फुगडी, मंगळागौर, फेर धरून नाचणे आदी करमणूक व मनोरंजनाचे कार्यक्रमही घरोघरी करण्यात आले.

## मिरवणुकीत हिंदू-मुस्लिम एकोप्याचे दर्शन



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरान शहरात दीड दिवसाच्या बाप्पांना गुरुवारी सायंकाळी वाजत गाजत, उत्साहात निरोप देण्यात आला. गणेश विसर्जनासाठी गणेशभक्तांनी मिरवणुकीत आणि विसर्जनस्थळी मोठी गर्दी केली होती. तसेच मुस्लिम बांधवांनी सर्व गणेशभक्तांना गुलाब पुष्प देऊन हिंदू-मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडविले. माथेरानधील मुख्य बाजार पेठेत जामा मशिदी समोर गतवर्षी प्रमाणे या वर्षी देखील स्थानिक मुस्लिम बांधवांकडून गणेशभक्तांना गुलाब पुष्प देऊन गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. विसर्जनस्थळी नगरपरिषदेकडून विद्युत रोषणाई करून संपूर्ण परिसर सुशोभित करण्यात आला होता. निर्माल्य जमा करण्यासाठी नगरपरिषदेकडून स्वच्छता दूतांची नेमणूक करण्यात आली होती. गणेश विसर्जन मिरवणुकीत याठिकाणी कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त देखील चोख ठेवण्यात आला होता. यामुळे माथेरान शहरातील दीड दिवसाच्या बाप्पाला उत्साही वातावरणात आणि आनंदात निरोप देण्यात आला.



● दीड दिवसाच्या गणरायाला निरोप देताना डोळ्यांत दाटले पाणी. (छायाचित्रः राजेश डांगळे)



## चिमुकल्यांच्या कडा ओलावल्या

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील धाटाव गावात गुरुवार (दि.२८)ऑगस्ट रोजी दीड दिवसाच्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. सोनारसिद्ध मंदिरा लगतच्या विसर्जनस्थळावर गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया,पुढच्या वर्षी लवकर या, गरज करत दीड दिवसाच्या सुमारे ३० गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन समयी पावसानेही थोडी उसंत घेतली होती. गावातून निघालेल्या विसर्जन मिरवणुकीत असंख्य लहान थोर मंडळीसह ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग सुद्धा सहभागी झाले होते. अवघी दोन दिवस बाप्पाची सेवा करण्यासाठी मिळाल्याने विसर्जन समयी भावपूर्ण निरोप देताना काही चिमुकल्यांच्या डोळ्याच्या कडा ओल्या झाल्याचे पहावयास मिळाले होते.

## माणगावात पोलिसांचा चोख बंदोबस्त

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या... गजरात माणगाव तालुक्यातील २५०६ गणपतींचे काळ व गोद नदीच्या पात्रातून तसेच तलावातून भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी माणगाव पोलीस ठाण्यातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

विसर्जन दिवशी दुपारपासूनच पावसाची संततधार तालुक्यात सुरू होती. दुपारी ३ वाजल्यापासून सायंकाळपर्यंत विसर्जन तालुक्यात सुरू होते.



विसर्जनासाठी आलेल्या सर्व गणेशभक्तांचे नगर पंचायततर्फे स्वागत करण्यात आले. बामणोली गोद नदीठीकणी विसर्जनासाठी आणलेल्या सर्व गणरायांचे नगरसेवक अजित तार्लेकर यांनी नगरपंचायतीतर्फे स्वागत केले. तसेच माणगाव येथील काळनदी ठिकाणच्या गणपती विसर्जन घाटाजवळ नगरपंचायतीचे कर्मचारी गणरायाचे विसर्जन करण्यासाठी तैनात ठेवण्यात आले होते. यावेळी काळनदी विसर्जन घाटाजवळ तसेच पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आली होती. नगरपंचायतीतर्फे आलेल्या सर्व गणरायांचे स्वागत करण्यात आले.

## रसायनीत भजनाच्या तालावर निरोप

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



रसायनी व आसपासच्या परिसरातील दीड दिवसांच्या गणरायाचे भक्तीभावाने विसर्जन करण्यात आले. दुपारी तीन वाजल्यापासून मोहोपाडा तलाव, रिस पुल, कांबा पुल, पाताळगंगा नदी, वावेघर घाट, गुळसुंदे, वाशिवली, लोहोप, कासप, बारवई पुल आदी ठिकाणी गणरायांचे विसर्जन करण्यात आले. ढोल ताशे, टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तगणांनी बाप्पाला निरोप दिला. मोहोपाडा तलावावर २०८, रिस पुल-१३६, कांबे पुल-३८, पाताळगंगा-७६, वावेघर-२५, गुळसुंदे-६२, तळेगाववाडी-५६, कासप-१९ गणरायांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. रसायनी पोलिसांनी विसर्जनस्थळी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. काही विसर्जनस्थळी रोटरी क्लबच्यावतीने निर्माल्य ठेवण्यात आले होते.

## बालसुरक्षेची सेवा बाप्पाचरणी 'अर्पण'

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



यंदाच्या गणेशोत्सवात बाल लैंगिक शोषणाला आळा घालण्यासाठी आणि अशा घटनांमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी कार्यरत असलेल्या अर्पण संस्थेने रायगड पोलीस विभाग आणि महिला व बालविकास विभाग, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत २०० पेक्षा अधिक सार्वजनिक गणेशोत्सव मंडपांमध्ये आणि गणेश विसर्जन मिरवणुकीच्या मुख्य मार्गांवर, बाल लैंगिक शोषण प्रतिबंधावर जनजागृती करणारे फलक लावण्यात आले आहेत. मुलांना बाल लैंगिक शोषणाविषयी आवश्यक ती माहिती आणि कौशल्ये प्रदान करून त्यांना स्वतःचे रक्षण करण्यासाठी सक्षम बनवणे आणि त्यांच्यासोबत आलेल्या प्रौढ व्यक्तींना बाल लैंगिक शोषणाविषयी जागरूक बनवून, त्यांना आपल्या मुलांचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

बाल लैंगिक शोषण हा एक अत्यंत गंभीर अपराध असून, आपल्या देशात दर दिवशी १८७ मुलांचे लैंगिक शोषण केले जाते. विशेष म्हणजे ९७ टक्के घटनांमध्ये मुलांचे लैंगिक शोषण हे त्यांच्या ओळखीच्या व्यक्तींकडून केले जाते. त्यामुळे या जनजागृती मोहिमेद्वारे शोषणाच्या प्रतिबंधावर विशेष भर दिला जाणार असून, मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाचा व्यापक प्रचार केला जाणार आहे.

> **यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त विविध गणेशोत्सव मंडपांमध्ये अर्पण संस्थेतर्फे आयोजित वैयक्तिक सुरक्षा जनजागृती मोहिमेत सहभागी होताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. पालक आणि मुलांना वैयक्तिक सुरक्षेच्या मूलभूत नियमांविषयी जागरूक केल्यास आपण बाल लैंगिक शोषणाला आळा घालू शकतो. समाजापर्यंत हा संदेश पोहोचवणे आवश्यक आहे. कायद्याचे रक्षणकर्ते म्हणून आम्ही त्यांच्या या उपक्रमाच्या पाठीशी आहोत. - आचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड**

> **बाल लैंगिक शोषणमुक्त जग निर्माण करणं हे अर्पणचं मुख्य उद्दिष्ट आहे. जर आपण मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी एकत्रपणे काम केलं, तरच आपल्याला हे उद्दिष्ट पूर्ण करता येईल. सर्वप्रथम आम्हाला मुंबई पोलिसांचे मनापासून आभार मानायचे आहेत. कारण ते अर्पणच्या प्रत्येक उपक्रमामध्ये ठामपणे आमच्या पाठीशी उभे राहतात आणि आम्हाला सर्वतोपरी मदत करतात. - पूजा तापडिया, संस्थापिका तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, अर्पण**

या जनजागृती मोहिमेच्या माध्यमातून गणेश मंडपांमध्ये बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो मुलांना आणि त्यांच्या पालकांना 'पिंकी' नावाच्या व्यक्तिरेखेवर आधारित एका गोष्टीमार्फत वैयक्तिक सुरक्षा शिक्षणाचे पाच मूलभूत संदेश दिले जाणार आहेत. गणेश मंडपांमध्ये भाविकांच्या दर्शनाची रांग जिथून सुरू होईल, तिथे अगदी मध्यवर्ती भागातच या संदेशांचे फलक लावण्यात आले आहेत. जेणेकरून सर्व भाविकांना हे संदेश वाचून त्यांचा अर्थ समजून घेता येईल. प्रत्येक फलकावर एक क्यूआर कोड दिला असेल, जो स्कॅन केल्यास मुलांना आणि त्यांच्या पालकांना अर्पणच्या ई-लर्निंग प्लॅटफॉर्मला भेट देऊन, पिंकीची संपूर्ण गोष्ट वाचता येईल. यामुळे पालकांना आणि मुलांना रांगेत उभे राहून या विषयाबद्दल अधिक जाणून घेता येईल. गणपती ही विद्येची आणि बुद्धीची देवता असल्याने, मुलांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना वैयक्तिक सुरक्षेशी संबंधित महत्वाची माहिती देण्याचा, यापेक्षा अधिक चांगला आणि योग्य क्षण आणखी कोणता असू शकतो? यावर्षी अर्पणची ही मोहिम मुंबई पोलीस, रायगड पोलीस विभाग आणि महिला व बालविकास विभाग रायगड, यांच्या सहयोगाने राबवली जात आहे. या उपक्रमामुळे गणेशोत्सव फक्त भक्तीपुरता मर्यादित न राहता, त्याला प्रत्येक मुलाला सुरक्षित ठेवणाऱ्या आणि त्याचे रक्षण करणाऱ्या व्यापक सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त होईल, यात शंका नाही.



# ...म्हणे चारित्र्य घडवणार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिल्लीत तीन दिवसांचा जंगी कार्यक्रम झाला. मोहन भागवतांची भाषणे झाली. देशोदेशींचे राजदूत, पत्रकार इत्यादींना निमंत्रित करण्यात आले होते. शंभर वर्षे झाली तरी संघाची मानसिकता बदललेली नाही हे यावेळी पुन्हा एकवार दिसले. आता तर संघाचा मानसपुत्र भाजप आणि तमाम सगळे स्वयंसेवक ठिकठिकाणी सत्तेत आहेत. त्यामुळे संघाला बदलायची गरजही नाही अशीच एकूण भूमिका दिसली. संघाचे सामान्य कार्यकर्ते हे नेहमीच्या व्यवहारात अतिशय साधे, सज्जन असतात. लोकांच्या मदतीला धावून जाण्याची शिकवण त्यांना मिळालेली असते. पण संघाची विचारसरणी मात्र याच्या नेमकी विरुध्द असते. संघाच्या नेत्यांच्या भाषणात, त्यांच्या कार्यक्रमांमध्ये ती दिसते. छुपेपणा, गोलगोल पण लबाड बोलणे ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये. मोहन भागवत यांच्या परवाच्या भाषणांमध्ये व शेवटी झालेल्या प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमामध्ये त्याचा प्रत्यय आला. संघ हा राजकीय नव्हे तर सांस्कृतिक संघटना आहे असा दावा संघाचे नेते करतात. पण देशाच्या राजकारणात उलथापालथी करण्याचे उपद्व्याप सतत चालू असतात. बाबरी मशिदीचे आंदोलन असेच उभे करण्यात आले. त्याच्याशी आमचा संबंध नाही असे सांगत सांगत नंतर संघ परिवारातील संघटना त्यात सामील झाल्या. याचा राजकारणाशी संबंध नाही असे म्हणत म्हणत भाजपचा तो राजकीय कार्यक्रम झाला. त्याच्या आधारे निवडणुका लढवल्या गेल्या. अयोध्येत मशीद पडल्यानंतर आता इतरत्र अशा कोणत्याही मशिदींवर दावा सांगितला जाणार नाही असे संघाच्या नेत्यांनी म्हटले होते. आता परवा भागवतांनी काशी आणि मथुरा इथल्या वादांना फूस मिळेल असे वक्तव्य केले. या आंदोलनांमध्ये संघ उतरणार नाही, पण स्वयंसेवक भाग घेऊ शकतात असे ते म्हणाले. याचाच अर्थ येत्या उत्तर प्रदेश निवडणुकांच्या आधी हे दोन विषय तापवले जाणार व त्यात संघ तेल ओतणार हे उघड झाले. उद्या या आंदोलनांमध्ये तोडफोड झाली, दंगे झाले, मशीदीची पाडापाड झाली की त्याच्याशी संघाचा संबंध येऊ नये, पण छुपेपणाने हे आमच्याच लोकांनी केले असे सांगून त्याचे क्रेडिटही घेता यावे अशी ही लबाड व्यवस्था आहे.

## काशी, मथुरेबाबतही लबाडी

मुस्लिमांनी उदार व्हावे व काशी आणि मथुरा हिंदूंच्या हवाली करावी असे भागवत सुचवतात. त्यानंतर इतर मशिदींवर हिंदूंनी दावा सांगू नये असेही म्हणतात. पण काशी आणि मथुरा इथे न्यायालयाच्या आदेशाने जे काय व्हायचे ते होईल अशी भूमिका ते घेत नाहीत. शिवाय, समजा हे प्रश्न सुटले आणि उद्या अन्य ठिकाणी अशी आंदोलने सुरु झाली तर आपण ती रोखू असा शब्द भागवत देत नाहीत. अशा आंदोलनांचा आपण निषेध करू व हे करणारे सच्चे हिंदू नसतील असे आपण सांगू असे भागवत म्हणत नाहीत. हीदेखील जुनीच लबाडी आहे. महात्मा गांधींच्या बंदीनंतर याच लबाड वृत्तीने त्यांनी नेहरु सरकारला काही आश्वासने दिली. याच रीतीने आणिबाणीच्या काळातही बाळासाहेब देवरसांनी सरकारशी जुळवून घेण्याच्या हालचाली केल्या. हे संघाचे जुनेच डावपेच आहेत. दिलेला शब्द, इमानदारी, प्रामाणिकपणा, तत्व यांच्याशी संघाच्या नेत्यांना काहीही देणेघेणे नाही असा याचा अर्थ निघतो. मुस्लिमांच्या संदर्भात बोलताना भागवतांनी याहीवेळी काही मखलाशीपूर्ण विधाने केली. आपण या भारतातलेच आहोत हे इथल्या मुस्लिमांनी ओळखावे व हिंदूंशी तसे वर्तन करावे म्हणजे वादविवादांचा प्रश्नच येणार नाही असे ते म्हणतात. पण सध्याचा प्रश्न हा हिंदूंनी मुस्लिमांना आपले न समजण्यातून निर्माण झाला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर देशातील सर्व मुस्लिमांवर बहिष्कार घालण्याची आवाहने करण्यात आली, उत्तरेतील कावड यात्रेत मुस्लिम हॉटेलवाल्यांवर बहिष्कार घालण्यात आला वा त्यांची तोडफोड करण्यात आली. फार काय, परवा एका अभिनेत्याने मुस्लिम मूर्तीकाराकडची गणपतीची मूर्ती घेण्याबाबत भेदभाव करू नये असा संदेश देणारे एक रील केले तर तथाकथित हिंदुत्ववाद्यांनी त्यालाही आक्षेप घेतला व धमक्या दिल्या. मोहन भागवत हे या हिंदुत्ववाद्यांविषयी कधीही बोलत नाहीत. गोरक्षा करण्याच्या नावाखाली हिंदुत्ववादी गुंड सध्या गावोगावी हैदोस घालत आहेत. त्यांचा चकार शब्दानेही भागवत कधी निषेध करत नाहीत.

## हिंदू गुंडांचा निषेध नाही

भागवतांनी मुस्लिमांना उपदेश केला तो ठीक आहे. पण एक प्रबळ हिंदू संघटनेचे नेते म्हणून हिंदुत्वादाच्या नावावर माफियागिरी व गुंडगिरी करणाऱ्यांना आम्ही हिंदू मानत नाही असे ते कधीही चुकून बोलणार नाहीत. खरे तर ते आणि त्यांचा परिवार यांनी इतकी वर्षे जो मुस्लिमांविरुध्द द्वेषपूर्ण प्रचार केला आहे त्याचीच ही विष-फळे आहेत. भागवत हे प्रामाणिक असतील तर त्यांनी या गुंडगिरीबद्दल खेद व्यक्त करायला हवा. पण तसे ते करणार नाहीत. कारण एका अर्थाने हा संघाच्या कार्यक्रमाचाच भाग आहे. मुस्लिमांना सरसकट देशद्रोही ठरवणे आणि ते हिंदूंच्या कृपेवरच या देशात जगू शकतात याची जाणीव करून देणे हा यातला अजेंडा आहे. त्यासाठी लव्ह जिहाद वगैरे कार्यक्रम हाती घेतले जात असतात. आता तर खुद्द पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून लोकसंख्येतील बदलाचा मुद्दा उपस्थित केला आहे. या देशात बांगलादेशी मुस्लिम घुसखोरांचे प्रमाण वाढत असून हिंदू लोकसंख्येला त्यामुळे धोका निर्माण होत आहे असे मोदींचे म्हणणे आहे. त्यासाठी लवकरच एक कार्यक्रम हाती घेतला जाणार आहे. पण मुळात गेली अकरा वर्षे जर देशात मोदींचे सरकार असताना इतक्या संख्येने घुसखोर देशात आले असे कसे असा प्रश्न उपस्थित होतो. भागवतांनी तो मोदींना विचारायला हवा. पण तो न विचारता तेही या खोट्या प्रचारात सामील झाले. त्याचाच एक भाग म्हणजे त्यांनी प्रत्येक कुटुंबाने तीन मुलांना जन्म द्यायला हवा असे आवाहन केले. मुस्लिमांची संख्या वाढत असून हिंदूंची संख्या मात्र कमी होत आहे अशी भीती पसरवण्याचा हा आणखी एक लबाड मार्ग आहे. बिहार, कर्नाटक, तमिळनाडू, बंगाल, केरळ व उत्तर प्रदेश या राज्यांच्या आगामी निवडणुकांमध्ये हा मुद्दा तापवून मते मिळवण्याचा नीच प्रयत्न भाजप करणार व संघाची त्याला साथ असणार हे भागवतांच्या प्रवचनांवरून स्पष्ट झाले. अर्थात, सध्या असल्या दांभिक खुनशीपणाची चलती आहे. लोकांच्या डोळ्यावर हिंदुत्वाचे झापड लावलेले आहे. भागवत आणि मोदी येत्या सप्टेंबरात ७५ चे होणार आहेत. तरीही आपल्या निवृत्तीचा प्रश्नच नाही असे भागवत यांनी काल स्पष्ट केले. त्यावरूनही ही दांभिकता दिसून येते. मोदींनी अडवानी, मुरलीमनोहर इत्यादींना वयाचे कारण दाखवून मार्गदर्शक मंडळात फेकून दिले. आणि आता तेच तत्व स्वतःला लागू करायला मात्र मोदीच काय पण थेट सत्तेत नसलेले भागवतही तयार नाहीत. आणि हे म्हणे चारित्र्यवान हिंदू घडवणार.

विचार

# जीएसटीतील सुधारणांचा फायदा कुणाला?

***भारतात जीएसटी लागू होऊन आठ वर्षे झाली. आता त्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात शुल्क लागू केल्यानंतर भारतात स्वदेशी वस्तूंच्या वापराची मोहीम नरेंद्र मोदी यांनी सुरू केली आहे. त्यासाठी बाजारात मागणी वाढवण्यासाठी सरकारने कर कमी करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. उत्सवकाळात उलाढाल वाढवून जीएसटी संकलन कमी होऊ न देण्याची दक्षता सरकार घेत आहे.***




**कैलास ठोळे**

देशाच्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्यमवर्गीय, सामान्य माणूस आणि लघु आणि मध्यम उद्योगांना दिलासा देण्यासाठी जीएसटीमध्ये सुधारणांची घोषणा केली. एक जुलै २०१७ पासून देशात जीएसटीची अंमलबजावणी सुरू झाली. त्या वेळी त्याचे वर्णन 'करक्रांती' असे करण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी करसुधारणा म्हणून त्याकडे पाहिले गेले असले, तरी 'एक देश, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास अजून २२ वर्षे वाट पहावी लागणार आहे. आपण पाश्चात्य देशांमधून ही कल्पना स्वीकारली आहे; परंतु भारतासारख्या खंडप्राय देशात आठ वर्षांमध्येही ती पूर्णपणे लागू करणे शक्य झालेले नाही. गेल्या सहा महिन्यांपासून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणांतर्गत जगातील विविध देशांवर आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला. अमेरिकेने निर्बंध लादण्याचा इशारा देऊनही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवले नाही. त्यामुळे ट्रम्प यांनी आता पन्नास टक्के आयात शुल्काची अंमलबजावणी करण्याचे जाहीर केले. ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन यांच्या बैठकीतूनही काहीच साध्य झाले नाही. अमेरिकेच्या नाक खुपसण्याच्या वृत्तीला भारताने विरोध करणे आणि धोरणात्मक निर्णयात लुडबूड करू न देणे हे योग्यच आहे. अशा परिस्थितीत ट्रम्प यांची एकाधिकारशाही वृत्ती पाहता आयात शुल्क कमी करण्याची शक्यता कमी आहे, असे गृहीत धरून मोदी यांनी 'स्वदेशी'चा नारा दिला आहे.

अमेरिकेबरोबरच्या ऐंशी अब्ज डॉलरच्या निर्यातीतील तफावत दूर करणे आणि स्वदेशीला चालना देण्यासाठी देशांतर्गत खप वाढवणे तसेच निर्यातीसाठी अन्य देशांचा शोध घेणे आवश्यक होते. खप वाढवायचा असेल, तर लोकांची क्रयशक्ती वाढवली पाहिजे किंवा वस्तू स्वस्त झाल्या पाहिजेत. त्यातील दुसरा पर्याय मोदी यांनी स्वीकारला आहे. त्यासाठीच त्यांनी जीएसटीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. याला पंतप्रधानांचे मोठे व्हिजन म्हटले जात आहे. केंद्र सरकारने सध्याच्या चार स्लॅबऐवजी दोन स्लॅब (५ आणि १८ टक्के) प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये वस्तूंना गुणवत्ता आणि मानक श्रेणीमध्ये ठेवले जाईल. त्याचा उद्देश मध्यमवर्गीय, सूक्ष्म आणि लघुउद्योगांना दिलासा देणे आहे. लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) आणि कृषी क्षेत्रावरील कराचा भार कमी केला पाहिजे. यासोबतच सामान्य माणसाच्या खिशावरील करांचा भार कमी होईल, यावर सरकारचा भर आहे. केंद्र सरकारने आणलेल्या प्रस्तावावर कोणत्याही एका बैठकीत मंत्रिगट सहमत होण्याची शक्यता कमी आहे. कारण हा प्रस्ताव बराच व्यापक आहे. त्याच्या बैठका आतापासून सुरू झाल्या आहेत. दिवाळीपूर्वी त्यावर निर्णय होऊन ऐन सणासुदीच्या काळात जास्त उलाढाल व्हावी आणि सरकारच्या जीएसटी संकलनावरही प्रतिकूल परिणाम होऊ नये, याची दक्षता घेतली जात आहे.

यासोबतच जीएसटीची नोंदणी आणि परताव्यासंबंधी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व्यापक बदल केले जातील. त्यामुळे, वेगवेगळ्या मंत्रिगटांमध्ये निर्णय घ्यावे लागतील. एका अधिकाऱ्याचे म्हणणे आहे की गरज पडल्यास, सतत बैठका घेऊन प्रस्तावावर एकमत होईल. दिवाळीपूर्वी कार आणि दुचाकी खरेदी करणाऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी येऊ शकते. केंद्र सरकार वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) दर बदलण्याचा विचार करत आहे. त्यामुळे वाहने स्वस्त होऊ शकतात. सध्या प्रवासी वाहने आणि दुचाकी वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जातो. आता सरकार कार आणि मोटारसायकल-स्कूटरवरील कर कमी करू शकते. जीएसटी परिषद लवकरच या संदर्भात मोठा निर्णय घेऊ शकते. असे झाले, तर दिवाळीपूर्वी कार आणि दुचाकी खरेदी करणे सोपे होईल आणि लोकांचे पैसेही वाचतील. याशिवाय, इंजिनच्या आकारानुसार आणि वाहनाच्या लांबीनुसार एक ते २२ टक्के अतिरिक्त करदेखील आकारला जातो. यामुळे, एकूण कर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचतो. तथापि, इलेक्ट्रिक कारवर पाच टक्के कराव्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त कर नाही. दुसरीकडे, दुचाकी वाहनांवर २८ टक्के जीएसटी आकारला जातो. ३५० सीसीपेक्षा जास्त इंजिन असलेल्या वाहनांवर तीन टक्के अतिरिक्त कर आकारला जातो. आता त्यात सुसूत्रता आणली जाईल. त्यामुळे वाहने स्वस्त होऊ शकतात. उपकरही रद्द होणार आहे. त्याचा दिलासा खरेदीदारांना मिळेल. याचा फायदा सामान्य कार आणि बाईक खरेदीदारांना होईल. तथापि, महागड्या कार्सवर ४० टक्क्यांपर्यंत कर आकारला जाऊ शकतो.

जीएसटीचे दर कमी केल्याने लहान कार आणि बाईक बनवणाऱ्या कंपन्यांना फायदा होईल. आजकाल या कंपन्यांना वाहने विकण्यात अडचणी येत आहेत. कारण वाहने महाग झाली आहेत आणि कर्जावरील व्याजही वाढले आहे. यापूर्वी मारुती सुझुकी इंडिया आणि हिरो मोटोकॉर्पसारख्या कंपन्यांनी सरकारकडे कर कमी करण्याची मागणी केली होती.

आता प्रस्तावित करानुसार कारच्या किंमती ४० हजार ते एक लाख रुपयांनी कमी होऊ शकतात. वाहन उद्योग आधीच मंदीत आहे. अशा परिस्थितीत कार कंपन्यांनाही करकपातीचा फायदा होईल आणि ग्राहकांच्या खिशावरचा भारही कमी होईल. कररचनेनंतर वाहनविक्रीत प्रचंड वाढ होऊ शकते आणि उत्सवाच्या हंगामात विक्रीचा विक्रम मोडता येईल. प्रस्तावित जीएसटी २.० फ्रेमवर्कअंतर्गत सरकार वस्तू आणि सेवा कराचे दोन स्लॅब म्हणजेच पाच आणि १८ टक्के जीएसटी आणेल. विमा प्रीमियमवरील जीएसटी १८ टक्क्यांऐवजी शून्य किंवा पाच टक्क्यांच्या कक्षेत येऊ शकतो. याचा फायदा सामान्य लोकांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि विमा कंपन्यांना होईल. जीएसटीच्या दोन स्लॅबमुळे जीवन आणि आरोग्य विमा प्रीमियम, औषधे, टूथब्रश आणि केसांच्या तेलावर शून्य कर लागू शकतो. छोट्या कार, एसी, टीव्ही आणि फ्रीजवरील कर दर कमी होऊ शकतात. तथापि, तंबाखू आणि सिगारेट महाग होतील. अन्नपदार्थ, औषधे, वैद्यकीय उपकरणे, स्टेशनरी, शैक्षणिक उत्पादने, टूथब्रश आणि केसांच्या तेलासह आवश्यक वस्तू एक तर करमुक्त असतील किंवा पाच टक्क्यांच्या कक्षेत येतील.

सुधारणांनंतर टीव्ही, एसी आणि रेफ्रिजरेटरसारख्या वस्तू २८ ऐवजी १८ टक्के कराच्या श्रेणीत येऊ शकतात. सरकारने ऑटोमोबाईल्स, हस्तकला, कृषी उत्पादने, कापड आणि खते ही विशेष लक्ष देण्याजोगी क्षेत्रे मानली आहेत. यामुळे सिमेंट स्वस्त होऊ शकते. किरकोळ वस्तू आणि चप्पल-शूजदेखील स्वस्त होण्याची अपेक्षा आहे. ट्रॅक्टरवरील सध्याचा बारा टक्के कर पाच टक्के स्लॅबमध्ये येऊ शकतो. एसी १८ टक्के कर स्लॅबमध्ये येऊ शकतो. सुधारणांच्या घोषणेमुळे वस्तूंची मागणी २.४ लाख कोटी रुपयांनी वाढण्याची अपेक्षा आहे. दरांमध्ये कपात केल्याने कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवरील भार कमी होईल. किरकोळ महागाई ०.४० टक्क्यांनी कमी होण्याची अपेक्षा आहे. सरलीकृत स्लॅब रचनेमुळे नमकीन, पराठे, बन आणि केक यासारख्या वस्तूंवरील वर्गीकरण वाद संपतील. पूर्वी, त्यावर वेगवेगळे कर दर लागू होते. हिरे आणि मौल्यवान दगडांवर ०.२५ टक्के आणि दागिन्यांवर तीन टक्के असे विशेष दर सुरू राहतील. केंद्र सरकारने अमेरिकेच्या शुल्कवाढीला उत्तर देण्याची तयारी केली आहे. यासाठी वस्तू आणि सेवा करात मोठा बदल करण्याची योजना आहे. जीएसटीच्या कक्षेत येणारे बटर, फळांचा रस, सुका मेवा यासारख्या ९९ टक्के वस्तू पाच टक्क्यांच्या कक्षेत येतील. सोप्या शब्दांमध्ये सांगायचे तर, या वस्तू सात टक्क्यांनी स्वस्त होतील. त्याचप्रमाणे, २८ टक्के कर श्रेणीत येणारे सिमेंट, एसी, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन यासारख्या ९० टक्के वस्तू १८ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये येतील. म्हणजेच त्या दहा टक्क्यांनी स्वस्त होतील.

सरकारने जीएसटी सुधारणांचा हा प्रस्ताव राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या गटाकडे पाठवला आहे. हा गट त्याचा अभ्यास करेल. त्यानंतर तो सप्टेंबरमध्ये होणाऱ्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत ठेवला जाईल. जीएसटी सुधारणांचे तीन प्रमुख आधार असतील. पहिली, संरचनात्मक सुधारणा. यामध्ये, कररचना आणखी सुधारली जाईल. दुसरी कर दरांचे तर्कसंगतीकरण करणे. त्यामुळे आवश्यक वस्तू स्वस्त होतील. तिसरे, नवीन नोंदणी आणि परतफेड सुलभ करणे. यामुळे इनपुट आणि आउटपुट कर दरांमध्ये संतुलन येईल आणि इनपुट टॅक्स क्रेडिटचा संचय कमी होईल. या सुधारणांचा थेट फायदा सामान्य माणसाला होईल. कर कमी केला तर अधिकाधिक लोक आरोग्य विमा घेऊ शकतील. नव्या प्रस्तावानुसार, कपडे, बूट आणि खते स्वस्त होतील. सध्या कपड्यांच्या कच्च्या मालावर बारा टक्के आणि तयार कपड्यांवर पाच टक्के जीएसटी आकारला जातो. सुधारणांनंतर दोन्हीवर पाच टक्के जीएसटी असेल. यामुळे वस्त्रोद्योगाचा खर्च कमी होईल. केवळ वस्त्रोद्योग क्षेत्रावर ट्रम्प टॅरिफचा दहा अब्ज डॉलर्सचा परिणाम होईल. नवीन सुधारणांमुळे टॅरिफचा परिणाम कमी होईल. खतातील इनपुटवरील कर १८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करता येईल. यामुळे शेतकऱ्यांना खत खरेदी करणे स्वस्त होईल. भरपाई उपकर रद्द केला जाईल.

चर्चा आजची

# खरंच 'खाकी'वाल्यांचा आशीर्वाद?



**राकेश लोहार**

जिल्ह्यात तंबाखू, गुटखा विक्री बंदीचा कायदा नावालाच दिसून येत आहे. गावागावात खुलेआम पानटपऱ्यांवर तंबाखू व गुटख्याची विक्री होत आहे. एवढेच नव्हे, तर शाळा परिसरालगत ही दुकाने खुलेआम सुरू असल्याचे अनेकदा समोर आले आहे. अनेकवेळा विक्रेत्यांवर कारवाई केल्याचेही ऐकिवात आहे. असे असताना या पानटपऱ्या सुरू होतातच कशा? तंबाखू, गुटख्याची विक्री करताना व्यावसायिकांना कसलीही भीती वाटत नाही, याबाबत आश्चर्यच वाटते. बिनधास्तपणे अवैध धंदे सुरु असताना पोलीस प्रशासन धडक कारवाई करणार कधी? रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा कारभार स्वीकारताच आचल दलाल यांनी अवैध धंद्यांवर धडक कारवाईचा जणू बडगाच उगारला. त्यामुळे निश्चितच अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले, हेसुद्धा खरे आहे. परंतु, तरीसुद्धा अद्याप अवैध पूर्णपणे बंद करण्यास यश आलेले नाही. पोलीस अधीक्षकांची समाजाप्रती असलेली बांधिलकी, आणि त्यामुळे समाज सुधारण्यासाठीची त्यांची तळमळच निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. परंतु, त्यांच्या आदेशाला त्यांच्याच दलातील काही पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून वाटाण्याच्या अक्षदा दाखवण्यात तर येत नाही ना, याबाबत आचल दलाल यांनी गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. कारण, आपल्याला आदेशाला रायगड पोलीस दलातील अधिकारी हरताळ फासत अवैध धंदेवाल्यांच्या पाठीशी राहात असतील, तर अशा अधिकाऱ्यांना धारेवर धरणे आवश्यक आहे. पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी अल्पाधीतच दोन नंबरच्या धंदेवाल्यांना धडकी भरवली आहे. असे असताना अवैध धंदे कोणाच्या जिवावर, कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत, हे शोधून काढणे गरजेचे आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, नागोठण्यासह अन्य तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री करण्यात येत असल्याची चर्चा आहे. गुटखा बंदीनंतर अनेकांनी मावा विक्रीचा नवा व्यवसाय सुरू केला. यातूनच गुटख्याची विक्री सुरुवातील चोरुन केली जात होती. आता सर्रासपणे केली जात आहे. तरुणांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवून निरोगी, सुदृढ समाजाच्या निर्मितीसाठी हातभट्टी दारु, गुटखा, मावा विक्रीवर कडक निर्बंध लावण्यात आले; पण शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे कायद्याचे पालन होत नाही. जिल्ह्यात शहरच नव्हे, तर ग्रामीण परिसरात गुटखा विक्री सर्रासपणे पानटपरी, दुकानांमध्ये होते. गुटखा विक्रीसाठी मोठी साखळी कार्यरत आहे. ही साखळी तोडल्यानंतरच गुटखा विक्री कमी होण्यास मदत होणार आहे. कारवाईची धडक मोहीम अधिक कडक करण्याची गरज आहे.

गुटख्याची तस्करी व विक्री करणाऱ्यांवर यापुढे मोका कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल यासंदर्भात विधी व न्याय विभागाचे मत विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल, अशी घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी विधान परिषदेत केली. हा गुटखा येतो कुठून, त्यामागे कोणाचा हात आहे, यावर विधिमंडळातही चर्चा झाली आहे. यात पोलीस, एफडीएचे अधिकारी आणि वेगेवगळे एजंट यांचा समावेश असल्याचे आरोपही झाले. त्यामुळे संबंधित आरोपींना मोका लावता येईल का, याबाबत विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन घेऊन कार्यवाही केली जाईल, अशी माहिती मंत्री झिरवळ यांनी अधिवेशानादरम्यान दिली आहे. त्यामुळे विक्रेत्यांवर तर कडक कारवाई झालीच पाहिजे. परंतु, हप्तेखोरी करुन अवैध धंदेवाल्यांना आश्रय देणाऱ्या अधिकाऱ्यांवरदेखील कठोर कारवाई व्हावी, अशीच रायगडच्या जनतेची मागणी असेल. बंदी असलेला गुटखा, सुगंधी पानमसाला तंबाखू किराणा दुकानांतही उघडपणे विकला जात असेल, तर त्यावर कारवाईची जबाबदारी अन्न प्रशासन विभागासह पोलिसांची आहे. काही प्रमाणात होणारी कारवाई ही दिखावा असल्याचा आरोपही कित्येकदा होतो. याचे कारण, कारवाईच्या काही दिवसांनंतर पुन्हा तेथे अवैध धंदे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील बेकायदा धंद्यांना तीव्र विरोध करुन धडक कारवाई करणाऱ्या पोलीस अधीक्षक आचल दलाल छुप्या मार्गाने विक्री होणाऱ्या गुटख्याबाबत काय भूमिका घेणार, तसेच अवैध धंदेवाल्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करतात, ते येणार काळच ठरवेल. परंतु, आचल दलाल कठोर कारवाई करुन अवैध धंदेवाल्यांचे कंबरडे कायमचे मोडतील, एवढीच अपेक्षा आहे.

लोकसंसद

## चतुरस्त्र अभिनेते बाळ कर्वे काळाच्या पडद्याआड



आपल्या चतुरस्त्र अभिनयाने नाटक, चित्रपट, मालिका अशा सर्वच क्षेत्रांत दर्जेदार अभिनयाचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांच्या निधनाने मराठी कलाक्षेत्राची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे. मूळचे पेशाने इंजिनिअर असलेले 'बाळ'कृष्ण कर्वे अभिनयाच्या ओढीने अभिनेते बनले आणि रंगभूमीवरील 'सूर्याची पिल्ले', 'रथचक्र', 'तांदुळ निवडता निवडता', 'मनोमनी', 'सुमन मनोहर लेले' अशा दर्जेदार नाटकांमध्ये त्यांनी भूमिका साकारल्या. 'प्रपंच', 'राधा ही बावरी', 'वहिनीसाहेब', 'उंच माझा झोका' या मालिकांमध्येही बाळ कर्वेंनी काम केले. 'जैत रे जैत' हा बाळ कर्वेंनी अभिनय केलेला पहिला चित्रपट होता. त्यानंतर 'सुंदरा सातारकर', 'चांदोबा चांदोबा भागलास का', 'चटक चांदणी', 'बन्याबापू' अशा अनेक सिनेमांमध्ये त्यांनी केलेल्या भूमिका प्रचंड गाजल्या. 'बन्याबापू' चित्रपटातील 'प्रीतीचं झुळझुळ पाणी' हे गाणे ५० वर्षानंतर आजही रसिकांच्या ओठावर रुंजी घालत आहे. मात्र अनेक वैविध्यपूर्ण भूमिका केलेल्या हिंदी चित्रपटातील अभिनेता अमजद खानची ओळख केवळ 'गब्बरसिंग' या व्यक्तिरेखे भोवती फिरत राहिली तशीच बाळ कर्वे यांची ओळख 'चिमणराव आणि गुंड्याभाऊ' या मालिकेत त्यांनी साकारलेल्या 'गुंड्याभाऊ' या भूमिके भोवती फिरत राहिली. बाळ कर्वे यांना भावपूर्ण आदरांजली.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# राष्ट्रीय लघु उद्योग दिन



भारताच्या विकासात लघु उद्योगांचे योगदान लक्षात घेऊन सन २००० मध्ये लघु उद्योग मंत्रालयाने लघु उद्योगांना सक्षम करण्यासाठी एक व्यापक धोरण पॅकेज सादर केले. या पॅकेजचा उद्देश या उद्योगांना त्यांच्या वाढीसाठी आवश्यक असलेला पाठिंबा देणे हा होता. या प्रयत्नाच्या यशामुळे संपूर्ण भारतात लघु उद्योगांच्या वाढीला चालना मिळाली. या कामगिरीची दखल घेतल्यानंतर एक वर्षानंतर, केंद्राने ३० ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय लघु उद्योग दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.

२००१ पासून राष्ट्रीय लघु उद्योग दिन साजरा केला जात आहे. लघु उद्योग दिन हा भारताच्या आर्थिक वाढ, रोजगार आणि नवोन्मेषात लघु उद्योगांच्या प्रचंड योगदानाचे स्मरण करण्यासाठी साजरा केला जातो. हा दिवस शहरी आणि ग्रामीण भागात आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या, रोजगार निर्माण करणाऱ्या आणि नवोपक्रमाला चालना देणाऱ्या लघु आणि लवचिक उद्योगांची पावती आहे.

लघु उद्योग म्हणजे १० कोटी रुपयांपेक्षा जास्त नसलेली आणि वार्षिक उलाढाल ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त नसलेली प्लांट आणि मशिनरी किंवा उपकरणांमध्ये गुंतवणूक. लघु उद्योग हे सहसा लघु स्तरावर उत्पादन किंवा सेवा पुरवण्याशी संबंधित असतात. हे व्यवसाय स्थानिक कामगारांना रोजगार देतात. बेरोजगारी आणि अर्ध-रोजगाराच्या समस्या सोडवण्यासाठी हे लघु उद्योग खूप महत्त्वाचे आहेत. कमी भांडवली गुंतवणूक, स्थानिक बाजारपेठांवर लक्ष केंद्रित करणे आणि लक्षणीय रोजगार निर्मिती ही लघु उद्योगांची तीन वैशिष्ट्ये आहेत.

९ मे २००७ रोजी, पूर्वीचे लघु उद्योग मंत्रालय आणि कृषी आणि ग्रामीण उद्योग मंत्रालय यांचे विलिनीकरण करून सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय तयार करण्यात आले. हे मंत्रालय धोरणे आखते, कार्यक्रम, प्रकल्प, योजनांना प्रोत्साहन देते आणि त्यांची अंमलबजावणी करते. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ मध्ये अधिसूचित करण्यात आला होता, ज्याचा उद्देश ला प्रभावित करणाऱ्या विविध समस्या, इतर गोष्टींबरोबरच, या क्षेत्राची व्याप्ती आणि गुंतवणूक मर्यादा यावर लक्ष केंद्रित करणे होता.

मे २०२४ पर्यंत, भारतातील उद्योग उद्योग पोर्टलवर ७,०१,०५३ लघु उद्योगांची नोंदणी झाली होती. तथापि, अनेक लघु व्यवसाय नोंदणीकृत नाहीत, ज्यामुळे देशाच्या आर्थिक परिदृश्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) मोठ्या परिसंस्थेत योगदान आहे.

राष्ट्रीय लघु उद्योग दिन साजरा करताना, भारताच्या अर्थव्यवस्थेत लघु उद्योगांचे महत्त्वपूर्ण योगदान मान्य करणे आवश्यक आहे. स्थानिक व्यवसायांना पाठिंबा देऊन, आपण केवळ आर्थिक विकासाला चालना देत नाही तर सांस्कृतिक वारसा जपण्यास आणि देशभरात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास मदत करतो. समृद्ध आणि स्वावलंबी भारताचा पाया रचत असताना या उद्योगांना पाठिंबा आणि प्रोत्साहन देत राहूया.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० ऑगस्ट

१) श्री. अशोक भगवंतराव बंड
पुणे, ३०-८-१९५२
२) मीना धीसुलालजी पारेख
अलिबाग, ३०-८-१९६२

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# माणगावची वाहतूक कोंडी सुटणार

## माणगाव-इंदापूर परिसरातील विकास प्रक्रियेला मिळणार गती; तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

**माणगाव - इंदापूर परिसरातील नागरिक, व्यावसायिक, प्रवासी व पर्यटक यांच्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडी ही कायमची डोकेदुखी ठरली आहे. इंदापूर व माणगाव येथील बायपास रस्त्यांची कामे रखडल्यामुळे या भागातील नागरिकांना तसेच महामार्गावरील वाहनधारकांना वारंवार प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.**



या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पर्यायी मार्गाचा शोध अनेक वर्षांपासून सुरू आहे. याच पार्श्वभूमीवरविपुल उभारे यांनी दोन दिवसांपूर्वी रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकास राज्यमंत्री ना. भरत गोगावले यांना लेखी निवेदन सादर केले होते. या निवेदनात वाढवण-कालवण-दाखणे-नाणोरे-माणगाव या कालवा मार्गाचा उल्लेख करत, तो पर्यायी मार्ग म्हणून वापरल्यास माणगावातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो, अशी ठोस भूमिका मांडण्यात आली होती. या निवेदनाची तातडीने दखल घेत मंत्री भरत गोगावले यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंह भोसले यांना २६ ऑगस्ट रोजी अधिकृत पत्र पाठवून या कालवा मार्गाचा प्रस्तावित रस्त्यांच्या कामांमध्ये समावेश करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

ना. गोगावले यांनी स्पष्ट केले की, या मार्गाचा काही भाग डांबरीकरण झालेला आहे, तर उर्वरित भागाचे काम पूर्ण झाल्यास हा रस्ता सुरक्षित व सोयीस्कर पर्याय ठरेल. त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल, तसेच पर्यटक व व्यावसायिकांना अखंडित व वेगवान वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. स्थानिक पातळीवर या निर्णयाचे स्वागत होत असून, अनेक वर्षांपासून रखडलेल्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर आता ठोस मार्ग निघण्याची आशा नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. मंत्र्यांनी घेतलेल्या या तातडीच्या दखलीमुळे माणगाव-इंदापूर परिसरातील विकास प्रक्रियेला गती मिळणार असून, शासनाचा वेगवान निर्णय प्रक्रियेवर विश्वास अधिक दृढ होणार आहे.मुंबई-गोवा महामार्गावर दरवर्षी सण-उत्सव, सुट्टीचा हंगाम, लग्नसराई तसेच सतत वाढणाऱ्या पर्यटकांच्या गर्दीमुळे भीषण वाहतूक कोंडी निर्माण होते. गौरी गणपती, होळी, दीपावली किंवा उन्हाळा सुट्टी कोणताही काळ असो, या महामार्गावर नागरिकांना तासन्तास वाहनांच्या रांगांमध्ये अडकून बसावे लागते. या परिस्थितीत प्रवासी, व्यापारी, पर्यटक यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. इंदापूर व माणगाव येथील बायपासचे काम रखडले असल्याने हा प्रश्न सुटण्यास अजून काही कालावधी लागणार आहे. मात्र दररोजच्या त्रासाला कंटाळलेल्या नागरिक, पर्यटक, प्रवाशांनी याचा पर्याय सूचवला आहे.

इंदापूर- वाढवण-पाणसई-कालवण-दाखणे-मुंढेवाडी-नाणोरे-माणगाव हा कालवा मार्ग तातडीने डांबरीकरण करून कार्यान्वित झाल्यास माणगावातील वाहतूक कोंडी कायमची संपुष्टात येऊ शकते. या रस्त्याचा काही भाग आधीच तयार असून उर्वरित काम पूर्ण झाले, तर हा मार्ग मुंबई-गोवा महामार्गावरील कोंडीचा खरा दिलासादायक पर्याय ठरेल, असा नागरिकांना ठाम विश्वास वाटत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव हे चाकरमान्यांसाठी जंक्शन म्हणून ओळखले जाते. मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाच्या वेळी खरेतर माणगावमधून जाणारा महामार्गाचा भाग सर्वप्रथम रूंदीकरण होईल अशी अपेक्षा होती, परंतु तसे झाले नाही. यामुळे महामार्गाचे चौपदरीकरण अन्य ठिकाणचे झाले, काही ठिकाणी सुरू आहे परंतु, माणगाव शहरातील रस्ता अरूंदच राहिला आहे. या रस्त्याला उपाय म्हणून कालवा मार्ग उत्तम पर्याय ठरणार आहे.

### सुवर्णकण



सर्व धर्मानी मान्य केलेली पाच तत्वे
ईश्वराचे अस्तित्व
ईश्वर सर्व ठिकाणी असून सर्वगत आहे
तो फक्त भक्तीनेच मिळतो
दुसऱ्या कशानेही मिळत नाही
तो अत्यंत कृपाळू आहे
त्याला कोणतीही गोष्ट अशक्य नाही.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

## नवसाला पावणारा मूगवलीचा गणपती

**| माणगाव | प्रतिनिधी |**



मुगवलीच्या गणपतीचे स्थान हे जागृत म्हणून परिचित आहे. शिवाय भक्तांच्या नवसाला पावणारा गणपती म्हणूनही त्याची सर्वत्र ख्याती आहे. रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावर माणगावपासून ३ कि. मी. अंतरावर मुगवली फाटा आहे. तेथून अवघ्या दिड किमी अंतरावर हे स्वयंभू गणेश मंदिर आहे. मुगवली हे गाव जरी छोटे असले तरी गणपतीमुळे त्याची ख्याती सर्वदूर पसरली आहे.

सुमारे ३२५ वर्षापूर्वी मुगवलीच्या परिसरातील एका शेतात एक शेतकरी नांगरणी करीत होता. अचानक शेतातील एका दगडास नांगराचा फाळ लागून तेथून रक्त येऊ लागले. हे पाहून त्या शेतकऱ्याने गावाकडे धाव घेऊन घडलेली सर्व हकीकत गावकऱ्यांना सांगितली. सर्व ग्रामस्थांनी याबाबत गोरेगावच्या जाणकारांचा सल्ला घेतला व हे गणेशाचे स्वयंभू महास्थान आहे, असे त्यांनी सांगितल्यावर ग्रामस्थांनी त्या पाषाणाभोवतालची जागा स्वच्छ केली. त्यानंतर सर्वांनाच नैसर्गिक अवस्थेतील गणेशाचे मोहक दर्शन झाले. ही मूर्ती जमिनीतून वर आलेल्या दोन फूट लांबी-रुंदीच्या पाषाणावर नैसर्गिक अवस्थेत असून, मस्तक, उभी वळलेली सोंड, पोट अशा स्वरुपाची आहे. मागील बाजूस सिंह असून, त्यास पाठ टेकून खाली पाय सोडून तो बसलेला आहे. गणेशाचे नेत्र नैसर्गिक अवस्थेत असल्यामुळे त्याचे डोळे बोलके वाटतात. सर्व ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी सुप्तावस्थेत असलेल्या या जागृत गणेशासाठी मंदिर उभारले. येथील गणेश हा पूर्वाभिमूख आहे. हा गणेश नवसाला पावतो अशी भाविकांची श्रद्धा असल्याने गणपती जागृत देवस्थान म्हणून परिचित आहे.

## मोहोपाडा ग्रामपंचायतीकडून शाश्वत सणांचा प्रसार

**| रसायनी | वार्ताहर |**



ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांच्यावतीने माझी वसुंधरा ६.० अंतर्गत पर्यावरणपूरक मूर्ती बसविणे व कृत्रिम जलाशयामध्ये मूर्ती विसर्जन करणे, ओला कचरा व सुका कचरा विलिनीकरण करणे, घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन करण्याबाबत ग्रामपंचायत हद्दीतील २५ पेक्षा अधिक गावांत जनजागृती करण्यात आली.

त्याचबरोबर वृक्षलागवड, फटाके बंदी, सेंद्रीय शेती, बायोगॅस, पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी रेन हार्वेस्टींग आदीबाबत सरपंच उमा मुंढे, उपसरपंच दिपक कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचाऱ्यांनी आवाहन केले.

दरम्यान गणेशोत्सवात दिड दिवसांच्या बाप्पाला निरोप देताना मोहोपाडा तलावाच्या काठावर माझी वसुंधरा ६.० अभियानाअंतर्गत शेड उभारुन कृत्रिम जलाशय विसर्जन करण्यासाठी तरुणांचे पथक नेमण्यात आले होते. यावेळी दिड दिवसांच्या बाप्पांना भावपूर्ण निरोप देताना गणेशभक्तांनी आपल्या जवळील कचरा निर्माल्य कलशात टाकून पर्यावरण संवर्धन केले.

### लॅपटॉपसह मोबाईलची चोरी

पनवेल : राहत्या रूमच्या उघड्या दरवाज्या वाटे कोणीतरी अज्ञात इसमाने रूममध्ये प्रवेश करून तेथे असलेले लॅपटॉप, मोबाईल व पैशाचे पाकीट चोरून नेल्याची घटना शहरातील लाईन आळी येथे घडली आहे. विवेक पुजारी रूम नंबर २०५, यश प्लाझा बिल्डिंगमधील त्यांच्या रूमच्या उघड्या दरवाज्या वाटे कोणीतरी अज्ञात इसमाने रूममध्ये प्रवेश करून तेथे असलेले लॅपटॉप , मोबाईल व पैशाचे पाकीट चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### कंटेनरमधील मालाची चोरी

**पनवेल :** एका ट्रेलरवर असलेल्या कंटेनरचे चोरटयांनी सील व लॉक तोडून लाखो रुपये किमतीचा माल चोरून नेल्याची घटना पनवेल भंगारपाडा येथे घडली आहे. अरविंद सिंग यांच्या मालकीच्या ट्रेलरवर असलेल्या कंटेनरचे अज्ञात चोरट्यांनी कोणत्यातरी हत्यारांनी सील व लॉक तोडून कंटेनर मधील लाखो रुपये किमतीचा माल चोरून नेल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी ते पळस्पे महामार्गालगत असलेल्या मामाचा ढाबा, भंगारपाडा येथे घडली आहे.याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नेरळ शिवसेना ठाकरे पक्षाकडून घरगुती गणेश सजावट स्पर्धा

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहर शाखेचे वतीने घरगुती गणेश सजावट स्पर्धेचे आयोजन केले आहे.शिवसेना शाखा आणि माऊली क्रियेशन यांच्याकडून आयोजन केले आहे.

गणेशोत्सव काळात घरगुती गणेश सजावट तसेच उत्कृष्ट गणेश मूर्ती स्पर्धा २५ वर्षापूर्वी सुरू झाल्या होत्या.तर दिवाळी मध्ये किल्ले आणि रंगावली स्पर्धा या देखील त्याच काळात नेरळ मध्ये शिवसेना शाखा भरवत होती. यावर्षी देखील शिवसेना शाखेच्या वतीने नेरळ ग्रामपंचायत मर्यादित घरगुती गणेश सजावट स्पर्धा आयोजित केली आहे. माऊली क्रियेशन आणि शिवसेना मध्यवर्ती कार्यालय यांच्याकडून ही गणेश सजावट स्पर्धा होणार आहे.या स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. नाव नोंदणीसाठी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय तसेच माऊली क्रियेशन कार्यालय आणि शहर शाखा प्रमुख हेमंत क्षीरसागर, उप शहर प्रमुख संतोष सारंग आणि महेंद्र शिंदे यांच्याकडे नाव नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### भागीरथी लक्ष्मण तरे यांचे निधन

**नेरळ :** कोदिवले येथील सामाजिक कार्यकर्ते आणि दहिवली ग्रामपंचायतचे माजी सदस्य जनार्दन तरे यांच्या मातोश्री भागीरथी लक्ष्मण तरे यांचे वृध्दापकाळाने वयाच्या



९५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. भागीरथी तरे या वारकरी संप्रदाय मध्ये अनेक वर्ष भक्तीभावाने सेवा करत होत्या.

## जुन्या वीज वाहिन्या, खांबांमुळे आषाणे गाव धोकादायक

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतीमधील आषाणे गावातील विजेच्या वाहिन्या आणि विजेचे खांब धोकादायक स्थितीत आहेत. याबाबत ग्रामस्थांनी महावितरण कंपनीला निवेदन विद्युत तारा लाईट पोल बदलणार कधी? अशी मागणी केली आहे. मात्र मोडकळीस आलेले विजेचे खांब आणि नेहमी तुटणाऱ्या तारा अशी स्थिती झाली असल्याने गावातील लोकांचा गावकरी यांची वाटचाल धोकादायक ठरत आहे.

आषाणे गावातील जुन्या झालेल्या जीर्ण विद्युत तारा आणि लाईटचे पोल बदली करण्यात यावे. याबाबत ग्रामस्थांनी कर्जत




महावितरणला आषाणे ग्रामस्थान कडून निवेदन देण्यात आले.जीर्ण झालेल्या विद्युत तारा मेन रोड वरील रहदारीच्या ठिकाणी तुटून पडत आहे.जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मुख्य रस्त्यावरून आषाणे गावात येताना रस्त्याच्या बाजुचे दोन लाईट पोल धोकादायक स्थितीत झुकलेले आहेत. तेही पाऊस वादळी वारा यामुळे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. महावितरणने आषाणे गावाच्या जीर्ण विद्युत तारा, लाईट पोल बदली करण्यात यावे अशी मागणी आषाणे ग्रामस्थांनी कर्जतचे महावितरण अधिकारी यांना दिले निवेदन निवेदनाची दखल घेतली नाही.काही अपघात घडल्यास अधिकारी जबाबदार असतील तसेच १०० वॅटच्या जागी २०० वॅटचा ट्रान्सफार्मर लावावा अशी मागणी आषाणे ग्रामस्थांनी कर्जतचे महावितरण अधिकारी अनुप पिंगळे यांना निवेदन केली आहे. यावेळी आषाणे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते .त्यावेळी आषाणे येथील सोपान ठाणगे, लहू श्रीखंडे, दीपक ठाणगे, मनोहर ठाणगे, मनोज ठाणगे, निलेश ठाणगे, संदीप ठाणगे, विश्वास ठाणगे, रामचंद्र श्रीखंडे, भरत ठाणगे उपस्थित होते.

## खारघरमध्ये अज्ञात चोरांनी केली महिलेची रस्त्यात लूट

**| पनवेल | प्रतिनिधी |**

चार दिवसांपूर्वी खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ येथील घरकाम करणारी महिला पायी चालत असताना तीच्या गळ्यातून ७५ हजार रुपयांचे दागीने दुचाकीस्वारांनी चोरण्याची घटना ताजी असताना दोन दिवसांपूर्वी २७ ऑगस्टला रात्री साडेनऊ वाजता खारघर येथील सेक्टर १२ येथे घरकाम करणाऱ्या ५७ वर्षीय महिलेला याच प्रकारे लुटण्यात आले आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात संबंधित महिलेला लुटीबाबत अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. सणासुदीच्या दिवसांमध्ये सामान्य घरकाम करणाऱ्या महिलांना लक्ष्य केले जात असल्याने पोलिसांनी या चोरट्यांना तातडीने पकडण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे.

खारघरमध्ये पायी चालणाऱ्यया कष्टकरी महिलांना लुटीचे सत्र सुरूच आहे. दुचाकीवर फिरणारे चोरट्यांकडून हे लक्ष्य केले जात आहे. एका दुचाकीवर बसून दोन चोरटे येतात आणि महिलांच्या गळ्यातील दागीने हिसकावून काही सेकंदात फरार होतात अशापद्धतीची या दुचाकीस्वारांची कार्यपद्धत आहे.

खारघर येथील सेक्टर १२ मधील गणेश दर्शन सोसायटीमध्ये राहणाऱ्या ५७ वर्षीय महिला यांनी शिलाई मशीनची मोटार दुरुस्तीसाठी दिली होती. ती मोटार घेऊन त्या घरी येत असताना साई मंदीरासमोरील रस्त्यावर अचानक त्यांच्यासमोर काळ्यारंगाच्या दुचाकीवरून दोनजण समोर आले. दुचाकीवरील मागे बसलेल्या तरुणाने पिडीत महिलेच्या गळ्यातील बोरमाळची पोत हिसकावली आणि काही समजण्याच्या आत तेथून धूम ठोकली.

## जेएनपीए ते गव्हाण फाटा वाहतूक कोंडी

**| उरण | प्रतिनिधी |**

शुक्रवारी सकाळी जेएनपीए बंदरातून जाणारे हजारो कंटेनर वाहने अडकून पडली आहेत. जेएनपीए बंदर ते करळ उड्डाणपूल, द्रोणागिरी औद्योगिक परिसर धुतुम,चिर्ले ते गव्हाण फाटा असा तब्बल दहा किलोमीटर लांबीच्या कंटेनर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीत उरण वरून जाणारी अनेक प्रवासी वाहनेही अडकली होती.

त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांचाही खोळंबा झाला होता. ही कोंडी दूर करण्यासाठी उरणच्या वाहतूक विभागाकडून प्रयत्न सुरू होते. पनवेल, नवी मुंबई आणि पुण्याच्या दिशेने जाणारी कंटेनर वाहनांच्या तीन तीन रांगा लागल्या होत्या. यातील एक रांग सुरू करण्यात उरणच्या वाहतूक पोलिसांनी यश आले आहे. त्यामुळे काही प्रमाणात या मार्गावरील कंटेनर वाहतूक सुरू झाली असल्याची माहिती उरणच्या वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी दिली आहे. जेएनपीएच्या सिंगापूर बंदरातून येणारी वाहतूक ही जसखार ते करळ उड्डाणपूलावर मोठ्या प्रमाणात कंटेनर वाहनांची वाहतूक झालेली होती. त्यामुळे करळ उड्डाणपूलावरून मुंबई, पनवेल आणि पुण्याच्या दिशेने जाणारी लहान वाहने, प्रवासी बसेस ही या वाहतूक कोंडीत अडकून पडल्या होत्या.

## मोदकांसाठी सुवासिक पिठाला मागणी

**| पनवेल | वार्ताहर |**

बाप्पाच्या सर्वांत आवडता नैवद्य म्हणजे मोदक असल्याने बाप्पांच्या आवडत्या उकडीच्या मोदकांना नैवेद्यांच्या हात मानाचे स्थान देण्यात येते. त्यामुळे उकडीच्या मोदकासाठी सुवासिक तांदळाच्या पिठाला चांगलीच मागणी वाढली आहे. त्यात अनेक गृहिणींद्वारे आजारातून सुवासिक तांदूळ खरेदी करून घरी पीठ तयार केले कत आहे.

यंदा आंबेमोहर तांदूळ मागच्या वर्षीच्या तुलनेत दुप्पटीने महागला आहे. आंबेमोहर तांदळाचे कमी उत्पादन, वाढलेला उत्पादन खर्च, शेतकरी आणि विक्रेत्यांकडून मिळणारा जास्त नफा, कमी शेतजमीन उपलब्ध असल्याने आणि इतर पारंपरिक धान्यांपेक्षा आंबेमोहर तांदळाची मागणी जास्त असल्याने, आंबेमोहर तांदळाच्या किमतीत वाढ झाली आहे. आंबेमोहर तांदूळ पिकवणारे शेतकरी आता कमी झाले आहेत.

त्यामुळे आंबेमोहर तांदळाचे एकूण उत्पादन कमी झाले आहे. तांदूळ पिकवण्यासाठी लागणारा खर्च वाढला आहे. यामुळे शेतकऱ्यांना जास्त नफा मिळवण्यासाठी किमत वाढवावी लागते. याशिवाय आंबेमोहर तांदूळ सुहासिक असल्याने आंबेमोहर तांदळाला मागणी अधिक आहे, मोदक बनविण्यासाठी इंद्रायणी, बासमती तांदळाच्या पिठाचा वापर देखील केला जात आहे बाजारात सुवासिक इंद्रायणी, बासमती तांदूळ जरी महाग असले तरी त्यांची विक्री अधिक केली जाते. रेडिमेड उकडीचे मोदक महाग मिळत असल्याने अनेक महिला पीठ विकत घेऊन घरच्या घरीच मोदक बनवतात, त्यासाठी बासमती, आंबेमोहर आणि इंद्रायणी तांदळापासून पीठ बनवून ठेवले जात आहे. काही महिला नुसत्या तांदळाच्या पिठाची उकड काढतात, मात्र, सुहासिक तांदळाच्या पिठापासून तयार केल्या जाणाऱ्या मोदकाची चव आणि सुगधे करली छानच असल्याने आंबेमोहर, बासमती तांदळाला मागणी वाढली आहे.

### विद्युत तारा तुटल्याचा बसला फटका | गणेशभक्तांच्या आनंदावर पडले विरजण

# सुधागड तालुक्यात तब्बल ८ तास वीज गायब

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

**ऐन गणेशोत्सवात गुरुवारी (दि. २७) पहाटे चार ते दुपारी बारा वाजेपर्यंत सुधागड तालुक्याची वीज तब्बल आठ तास गुल होती. झाड व वीज पडल्याने विद्युत तारा तुटल्या आणि इन्सुलेटर फुटले त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता.**



याबाबत सविस्तर माहिती अशी की, वारा पाऊस यामुळे उंबरवाडी येथील जंगलात एका ठिकाणी झाड कोसळून विजेच्या तारा दोन ठिकाणी तुटल्या तर येथे दुसऱ्या ठिकाणी वीज पडून इन्सुलेटर फुटले व विजेच्या तारा तुटल्या परिणामी संपूर्ण सुधागड तालुक्यातील वीज पुरवठा पहाटे चार वाजता खंडित झाला. याबाबत पाली वीज वितरण कार्यालयाचे उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांनी सांगितले की वीजपुरवठा खंडित झाल्यावर वीज महावितरणचे कर्मचारी लागलीच दोष शोधण्यासाठी निघाले. त्यावेळी लक्षात आले की उंबरवाडी येथे फॉल्ट आहे. हे क्षेत्र पूर्ण डोंगराळ व दाट वनांचे आहे. त्यामुळे दोष झालेल्या ठिकाणी महावितरणचे कर्मचारी अथक परिश्रम घेऊन पोहोचले. त्या ठिकाणी पोचल्यावर लगेच झाड तोडण्याची तसेच वीज तारा जोडण्याचे आणि इन्सुलेटर बसवण्याचे काम सुरू करण्यात आले, यासाठी काही वेळ लागला. मात्र वीज महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून अखेर वीजपुरवठा पुन्हा सुरळीत केला असे उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांनी सांगितले. ऐन गणेशोत्सवात तब्बल आठ तास वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे सुधागड तालुक्यातील जनता मेटाकुटीला आली होती.

### वीज कोसळून वीज खंडित

पावसाळ्यात वीज खांबावर वीज कोसळल्यामुळे तीव्र उच्च दाबामुळे विद्युत यंत्रणेतील सुरक्षा कवच असणाऱ्या या इन्सुलेटर्सना तडे जातात व ते फुटतात. म्हणून पावसाळ्यात वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढते. तेव्हा नेमका बिघाड शोधण्याकरीता रात्री-अपरात्री वीज कर्मचाऱ्यांना गस्त घालावी लागते, कसून तपासणी करावी लागते. ती विद्युत वाहिनी कधी रस्त्याकडेने, कधी शेतातून, झाडी वनांतून तर कधी ओढ्यातून, डोंगरातून गेलेली असते.

## बिर्ला कंपनीत पत्र्याची चोरी

**रसायनी :** पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील लोहोप जवळील बिर्ला कार्बन कंपनीतून अॅल्युमिनियम पत्र्याचा रोल चोरून नेणाऱ्या चोरट्यांच्या चौकडीला रसायनी पोलिसांनी अटक केली आहे. रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास यंत्रणा राबविण्यात आली. तपासिक अंमलदार पोहवा रणजीतसिंह खराडे यांनी मुद्देमालासह चोरी करणारे आरोपी विजय चंद्रकांत वाघमारे उर्फ विजय लक्ष्मण हिलम, विजय वसंत पवार, संजय श्रावण वाघे, महेश मारुती वाघे यांना मुद्देमालासह अटक केली असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## पुलावरून पडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** झोपेत ब्रिजच्या पिलरच्या कठड्यावरून पडुन एक इसम जखमी झालेल्या अवस्थेत पनवेल शहर पोलिसांना मिळून आल्याने त्यास उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून मृत झाल्याचे घोषित केले असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस किंवा पोलीस उपनिरीक्षक राहुल डोळस यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की आम्ही आमच्या अशिल (१) **विश्वास आत्माराम पाटील**, (२) **मनोहर आत्माराम पाटील**, (३) **वच्छला आत्माराम पाटील ऊर्फ सुरेखा रोहिदास कडवे**, (४) **शोभा आत्माराम पाटील ऊर्फ सुनयना सुनील घरत**, (५) **प्रेमा प्रकाश पाटील**, (६) **कांचला राजेंद्र थाळे**, (७) **हर्षला हरेश राऊळ**, (८) **योगिनी यशवंत ठाकूर**, (९) **संपदा नागेश पाटील**, (१०) **राजेंद्र महादेव थाळे**, (११) **दिलीप कुमार महादेव थाळे**, (१२) **कुसुम रवींद्र पाटील**, (१३) **कमला चंद्रकांत पाटील**, (१४) **महेश चंद्रकांत पाटील**, (१५) **मयुरी महेश म्हात्रे**, (१६) **वृषाली दशरथ पाटील**, (१७) **रुपाली सुनील गावडे**, (१८) **चैताली मंगेश चोरधेकर** (यापुढे एकत्रितपणे **"मालक"** म्हणून संदर्भित) यांच्याकडून जमीन, जे कृषी जमीन आहे, यापुढे **"सदर जमीन"** म्हणून संदर्भित, तिचा येथे खाली लिहलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या आहे खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर जमिनी किंवा तिच्या कोणत्याही भाग/भागा संबंधी कोणताही दावा जसे की विक्री, देवाण घेवाण, गहाण, ताबा, हमी, भेट, ट्रस्ट, देखभाल, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरार, धारणाधिकार, परवाना किंवा राईट ऑफ प्रिस्क्रीप्शन किंवा प्रिएम्प्शन किंवा कोणताही करार अंतर्गत किंवा इतर मनोरचना किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपात असतील तर त्यांनी कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि / किंवा ईमेल द्वारे kunal.vaidya@kangacompany.com येथे ह्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावा/ आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**
(सदर जमिनीचे वर्णन)

कृषी जमिनीचा सर्व तुकडा आणि हिस्सा ज्याचे गट क्र. १४८ (भाग) मोजमाप १ हेक्टर्स ३ आर्स (१०,३०० चौरस मीटर्स) जे मौजे कमरले, तालुका अलिबाग, जिल्हा रायगडे येथे स्थित आणि असलेले आहे.

३० ऑगस्ट, २०२५ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**
सही/-
कुणाल एस. वैद्य
भागीदार
अॅडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे नेवाळी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालकांकडुन त्या मिळकतींमध्ये जाणे येणेकरीता असलेल्या रस्त्याच्या व वहिवाटीच्या हक्कासह विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| विक्रांत गंगाधर जाधव | ४६ | १४/अ/१ | ०-३६-५० | ०-२५ |
| | ४६ | १८ | ०-१५-०० | ०-०८ |
| | ४६ | २० | ०-२६-०० | ०-१७ |
| गंगाधर कारभारी जाधव | ४६ | १६/अ/१७ | ०-२१-०० | ०-१४ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ३०/०८/२०२५

**अॅड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि.रायगड - ४१०२०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक बॅनर्जी दिबाकर यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २४ | ९/अ | ०-९३-०० | १-१३ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ह्या निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ३०/०८/२०२५

**अॅड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि.रायगड-४१०२०१.

### जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही श्री. सेविंदर तरण सिंग (**"मालक"**), पत्ता - मचाण वाडी, झिरड पाडा, गाव-झिरड, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र ४०२ २०१ यांच्या हक्क, शीर्षक आणि हितसंबंधांची तपासणी करीत आहोत, ज्यांनी याखाली लिहिलेल्या **अनुसूचीमध्ये** अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली सर्व बोजे आणि कोणत्याही स्वरुपाच्या प्रभारांपासून मुक्त असलेली मालमत्ता (**"मालमत्ता"**) आमच्या अशिलास विक्री, हस्तांतरित आणि अभिहस्तांतरित करण्याचे मान्य केले आहे.

कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा समाविष्ट असलेले कोणीही व्यक्ती/संस्था यांचा मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाकरिता किंवा त्या संदर्भात विक्री, मालकी, हस्तांतरण, अभिहस्तांकन, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेकरू, पोट-भाडेकरू, परवाना, भेट, हक्कसोड, देवाणघेवाण, काळजीवाहू आधारे, भोगवटा, ताबा, गहाणवट, प्रभार, बोजा, धारणाधिकार, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, वहिवाट, देखभाल, न्यास, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, न्यायालय/न्यायाधिकरणाचा आदेश/हुकूम/निकाल/निवाडा, जप्ती, कंत्राट/करारनामे या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे दावा करीत असल्यास किंवा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, इस्टेट, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास किंवा मालमत्तेच्या संदर्भातील मूळ शीर्षक कागदपत्रांचा वरील पैकी कशाच्याही आधारे किंवा अन्य कशाही प्रकारे ताबा असल्यास, त्यांना याद्वारे त्याबाबत निम्नस्वाक्षरीकारांना येथील प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, ते जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भातील त्यांचे हक्क ज्यावर आधारित आहेत आणि तसे सांगत आहेत त्या नोटरीकृत कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात खाली नमूद केलेल्या पत्त्यावर आणि ईमेल आयडीवर कळविण्याचे सांगण्यात येत आहे. असे न केल्यास असे दावे किंवा आक्षेप किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी, जर असल्यास, सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिली आणि/किंवा त्याग केली असे समजण्यात येईल.

**वरील उल्लेखित अनुसूची** (मालमत्तेचे वर्णन)

(i) अलिबाग इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह इस्टेट लिमिटेडद्वारे पारित दिनांक ५ एप्रिल, २००१ रोजीच्या भाग प्रमाणपत्र क्र. २३ अंतर्गत रु. १००/- (रुपये शंभर फक्त) प्रत्येकीचे सर्व ५ (पाच) पूर्णतः भरणा केलेले समभाग आणि (ii) उधमनगर, कुरुल वेश्वी, अलिबाग ४०२२०१ येथे स्थित गाव कुरुल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगडचा स. क्र. ११४/१/बी/२३ (पूर्वीचा बीईए ११४/ए/२ (भाग) धारण केलेला भूखंड क्र. २३, मोजमाप ६७४ चौ.मी. व त्यासह त्यावर उभी औद्योगिक संरचना.

**दिनांक ३० ऑगस्ट, २०२५**
**जानी अॅण्ड परीख करिता**
**शर्मन सी. परीख,**
**भागीदार**
**अॅडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**
३११, दलामल टॉवर, २११, फ्री प्रेस जर्नल मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
ईमेल: sherman@janiparikh.in


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बोरीस, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.बाळकृष्ण सावरमल शहा यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बोरीस | ५०/२/अ | ०-८२-५० | ५.३१ |
| | | पो.ख.०-०३-६० | |
| | | ०-८६-१० | |

**पैकी ० हे. ४३.०५ आर एवढे क्षेत्र (सदर मिळकत)**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३०/८/२०२५

सही/-
**अॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

दि. ३०/०८/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे खानंद, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे व हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| ३९ | १९ | ४४१-०० | ४४-१० |

ची बिनशेती जमीन मिळकत विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणा-पावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्तखत, खरेदीखत वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त बिनशेती जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त बिनशेती जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**अॅड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.''मातोश्री'' निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र.०९८८१५७९५५५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक कविता सिन्हा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे-नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रु पै |
|---|---|---|---|
| ४०९ | ५ | ३२०.६० | ३२-०६ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**अॅड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:-२,''लक्ष्मी सदन'',जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक प्रशांत पांडुरंग नाचण यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे-नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौरस मिटर | आकार रु पै |
|---|---|---|---|
| ४०९ | ६ | ३८२.५० | ३८-२५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**अॅड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

### महाराष्ट्र शासन
### सहकार विभाग
### सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय
**कॉंग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता.अलिबाग जि.रायगड पिन कोड ४०२२०१**
**Email ID : arcsalibag@gmail.com**

जा.क्र ४६९ — अर्ज क्रमांक ८५/२०२५

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित अलिबाग, रायगड
तर्फे श्री वैभव पांडुरंग पाटील वसुली अधिकारी अलिबाग, — **अर्जदार**

विरूद्ध

१.श्रीमती सविता घनःश्याम पुरस्वानी
मु.३०२, ए विंग शिवसदन बिल्डिंग, सरकारी वसाहत चे मागे
चेंढरे, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड पिन नं.४०२२०१
२.श्री.राजु घनःश्याम पुरस्वानी
मु.३०१, ए विंग शिवसदन बिल्डिंग सरकारी वसाहत चे मागे
चेंढरे, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड पिन नं.४०२२०१
३.श्री.व्यास श्रीजांगी सिंग — **प्रतिवादी/जाब देणार**
मु.रूम नं.२ साई अपार्टमेंट, मायशॉपी जवळ, विद्यानगर
पो.वरसोली, ता.अलिबाग जि.रायगड पिन नं.४०२२०९
४.श्री.देवीदास अप्पा फाळके
रूम नं.२०१-२०२ शिवसाई रेसिडेंसी, चेंढरे
पो.ता.अलिबाग, जि.रायगड पिन नं.४०२२०१

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रू.११६४५७०/- साठीचा अर्ज.**

ज्याअर्थी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग, रायगड तर्फे श्री.वैभव पांडुरंग पाटील वसूली अधिकारी अलिबाग यांनी दिनांक ०४/०७/२०२५ रोजी तुमचे विरूद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरूद्ध रक्कम रूपये ११६४५७०/-(अक्षरी रूपये अकरा लाख चौसष्ठ हजार पाचशे सत्तर मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे. आणि ज्याअर्थी नियमाचे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादीना नोटीस दिनांक ०७/०७/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. जी प्रतिवादी क्रमांक १ ते २ यांना बजाविली गेली नाही. त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देणेची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०९/०९/२०२५ रोजी दिवसाचे दुपारी १.०० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, कॉंग्रेस भुवन ट्रस्ट इमारत, पहिला मजला, महर्षी कर्वे रोड, पो.ता.अलिबाग जि.रायगड पिन कोड ४०२२०१ या कार्यालय तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्वीकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०८/२०२५

सही/-
**(अविनाश इंगळे)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

प्रोसेस जमा रू. — अर्जदार तर्फे अॅड.संजय द.म्हात्रे
नि क्र.८/ड

**जाहीर नोटीस**

**अलिबाग येथील मे. जिल्हा न्यायाधीश रायगड यांचे न्यायालयात**
दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक ११६/२०२५

श्रीमती कल्यानी किसन म्हात्रे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की अर्जदार हिने गार्डीयन्स अॅन्ड वॉर्डस अॅक्ट १८९० चे कलम ७ प्रमाणे तीचा अज्ञान मुलगा कु.सुयश किसन म्हात्रे याचा मौजे आगरसुरे, ता.अलिबाग येथील गट नं. ३४१, क्षेत्रफळ ०-९५-७० हे.आर., आकार रू. १२-८५ पै. पैकी क्षेत्र ०-५०-०० हे.आर. मधील चि.सुयश याच्या अविभक्त हिश्याचे पालक म्हणून नियुक्त केल्याचे जाहीर करणेकरीता आणि कलम २९ अन्वये चि. सुयश किसन म्हात्रे याचा सदरहू मिळकतीमधील अविभक्त हिस्सा, मालकीहक्काची विक्री इतर सह मालकांसह नियोजीत खरेदीदार यांचे लाभांत करण्याकरीता परवानगी मिळणेकामी त्याची जनक आई या नात्याने अर्ज दाखल केला आहे.

ज्या कोणाचा वर नमुद मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध आहे अथवा वरील मिळकतीबाबत अर्जदार यांना कु.सुयश याचे पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त करून जाहीर करण्यास आणि गट नं.३४१, क्षेत्रफळ ०-९५-७० हे.आर., आकार रू.१२-८५ पै. पैकी क्षेत्र ०-५०-०० हे.आर. या मिळकतीमधील कै.किसन दत्तात्रेय म्हात्रे याचे कायदेशीर वारस म्हणून अविभक्त हिश्याची विक्री इतर सह मालकांसह नियोजीत खरेदीदाराचे लाभांत करण्यास हरकत उपस्थित करण्यांची आहे अशा व्यक्तींनी दिनांक १०/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. न्यायालयासमोर उपस्थित राहुन त्याबाबतचे आपले लेखी म्हणणे, हरकत सादर करावी.

उपरोक्त मुदतीत कोणाचाही कसलीही हरकत न आल्यास अर्जदार यांना चि. सुयश याचे सहमालकीचे आगरसुरे गट नं.३४१. क्षेत्रफळ ०-९५-७० हे.आर. चौ.मी., आकार रू. १२-८५ पै. पैकी क्षेत्र ०-५०-०० हे. आर. मधील या मिळकतीबाबत पालक/पालनकर्ते म्हणून नियुक्त करून जाहीर केले जाईल आणि सदर मिळकती मधील कु.सुयश याच्या अविभक्त हिश्याची विक्री नियोजित खरेदीदाराचे लाभांत करण्याची परवानगी देण्यात येईल हे सर्वास कळावे.

आज रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

**कनिष्ठ लिपीक** — **अधिक्षक**
**जिल्हा न्यायाधीश** — **जिल्हा न्यायाधीश**
**रायगड अलिबाग** — **रायगड अलिबाग**
कोर्टाचा शिक्का

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक ११३) — बुधवार, ऑगस्ट ६, २०२५/श्रावण १५, शके १९४७ — (पृष्ठे ७, किंमत: रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २८८**
**प्राधिकृत प्रकाशन**
**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**..उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,**
**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**
**दिनांक ६ ऑगस्ट, २०२५**
**सूचना**

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१

क्रमांक आयडीसी-२०२१/प्र.क्र.४६/उद्योग-१४.-ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र तीन) यांच्या कलम १, पोट-कलम (३) अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, आयडीसी २०२१/प्र.क्र.४६/उद्योग- १४, दिनांक २७ मे, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना, महाराष्ट्र शासन साधारण राजपत्र, भाग चार-ब, दिनांक २-८ जून २०२२, पृष्ठ क्र.१ ते ९ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उपरोक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेत नमूद केलेले 'मौजे पानसई, कोशिंबळे तर्फे निजामपूर, कालवण, भाले, कांदळगाव, बोंडशेत जावटे, तालुका माणगांव तसेच मौजे पाथरशेत, तालुका रोहा, जिल्हा रायगड'' येथील क्षेत्रास दिनांक २ जून २०२२ या तारखेपासून लागू करण्यात आलेले आहेत व उक्त क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या कलम २ खंड (ग) अन्वये, ''औद्योगिक क्षेत्र'', म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अनुसूचीमध्ये जाहीर केलेल्या जमिनी त्याभागात समाविष्ट आहेत. (यापुढे याचा उल्लेख ''उक्त जमीन'' असा करण्यात येईल.) ;

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता उक्त जमिनी औद्योगिक क्षेत्र म्हणून विकासासाठी या जागेची आवश्यकता असल्याचे राज्य शासनाचे मत आहे ;

आणि, ज्याअर्थी उक्त जमिनीच्या जमीन मालकांचे व त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे म्हणणे अधिनियमांच्या कलम ३२ चे पोट-कलम (२) प्रमाणे ऐकून घेतलेले आहे व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने या कलमाच्या ३२ चे पोट-कलम (१) च्या अनुषंगाने उक्त जमीन संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ (१) चा वापर करून सदर जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादीत केल्या असल्याबद्दलची ही नोटीस महाराष्ट्र शासन या कलमा अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रसिद्ध करीत आहे.

**अनुसूची**
**मौजे पाथरशेत, तालुका रोहा, जिल्हा रायगड.**

| अ.क्र. | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| १ | १५४ | ० | ०.००२ |
| २ | १५५ | ० | ०.५१९ |
| ३ | १५६ | ० | ०.१४० |
| ४ | १५७ | ० | ०.११८ |
| ५ | १५८ | ० | ०.६७० |
| ६ | १५९ | ० | ०.३११ |
| ७ | १६० | ० | ०.००५ |
| ८ | १६१ | ० | ०.१२७ |
| | | एकूण | १.८९२ |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**डॉ. श्रीकांत पुलकुंडवार,**
**शासनाचे सहसचिव**

## २०३० राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी

# भारत बोली लावणार

### मंत्रिमंडळाची मंजुरी, अंतिम मुदत ३१ ऑगस्ट; यजमानपद मिळेल की नाही याचा निर्णय नोव्हेंबरमध्ये

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०३० मध्ये अहमदाबादेत होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी भारत दावा करणार आहे. बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाने बोली प्रस्तावाला मान्यता दिली. यापूर्वी १४ ऑगस्ट रोजी भारतीय ऑलिंपिक संघटनेने याला मान्यता दिली होती. आता भारताला ३१ ऑगस्टपर्यंत अंतिम बोली प्रस्ताव सादर करावा लागेल. यजमानपद द्यायचे की नाही हे नोव्हेंबरच्या अखेरीस ठरवले जाईल.



कॅनडाच्या शर्यतीतून बाहेर पडल्यानंतर, २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याची भारताची शक्यता वाढली आहे. गेल्या महिन्यात, राष्ट्रकुल क्रीडा संचालक डॅरेन हॉल यांच्या नेतृत्वाखालील एका पथकाने अहमदाबादमधील स्थळांना भेट दिली आणि गुजरात सरकारच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकही घेतली. राष्ट्रकुल क्रीडा ही अशी संघटना आहे जी एखाद्या देशाला यजमानपदाचे अधिकार देण्याचा निर्णय घेते.

भारत २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेचे आयोजन करण्याची तयारी करत आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये भारताने या स्पर्धेच्या आयोजनासाठी बोली लावली होती.२०३२ च्या ऑलिंपिक यजमानपदाची जबाबदारी ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन येथे सोपवण्यात आली आहे. तर २०२८ चे ऑलिंपिक लॉस एंजेलिस येथे होणार आहेत. भारताने २ आशियाई खेळांचेही आयोजन केले आहे

भारताने आतापर्यंत ३ बहु-क्रीडा खेळांचे आयोजन केले आहे. यामध्ये १९५१ आणि १९८२ च्या आशियाई खेळांचा आणि २०१० च्या राष्ट्रकुल खेळांचा समावेश आहे. २०१० च्या राष्ट्रकुल खेळांचे आयोजन दिल्ली येथे झाले होते.

### राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या बोली प्रक्रियेचे ५ टप्पे

- खेळांचे आयोजन करू इच्छिणाऱ्या शहराने (देशाने) कॉमनवेल्थ स्पोर्टसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.
- यानंतर त्या देशाची राष्ट्रीय ऑलिंपिक समिती प्रस्तावाला मान्यता देते.
- देशाच्या सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर, अंतिम बोली लावावी लागेल.
- कॉमनवेल्थ स्पोर्ट्सचे अधिकारी यजमान शहर आणि ठिकाणाची पाहणी करतात.
- सर्व स्पर्धक शहरांची पाहणी केल्यानंतर, कॉमनवेल्थ स्पोर्टची जनरल असेंब्ली अंतिम यजमानपदाची घोषणा करते.
- गेल्या वर्षी, २०३६ च्या ऑलिंपिकसाठी दावा केला होता

## बुद्धिबळ स्पर्धेत शारदा मंदिर शाळेचे वर्चस्व

### हॉलिबॉल स्पर्धेत शासकीय आश्रमशाळा पिंगळस अजिंक्य



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका पावसाळी क्रीडा महोत्सवातील बुद्धिबळ आणि हॉलिबॉल स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला आहे. बुद्धिबळ स्पर्धेत कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेचा विद्यार्थ्यांनी तीन गटात विजेतेपद मिळविले आहे. तर कशेळे येथील ऑर्किड इंग्लिश मिडीयम स्कूल यांनी दोन गटात विजेतेपद मिळविले आहे. तर हॉलिबॉल स्पर्धेत शासकीय आश्रमशाळा पिंगळस यांनी तीन गटात विजेतेपद मिळविले.

कर्जत तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा सुरू झाल्या असून बुद्धिबळ आणि हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन कर्जत शहरातील गुंडगे येथील गुड शेफर्ड कॉन्व्हेन्ट स्कूल येथे करण्यात आले होते.

या स्पधचे उद्‌घाटन तालुका गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे आणि गुड शेफर्ड शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर अमला यांचे हस्ते झाले. त्यावेळी तालुका गट समन्वयक प्रदीप सुर्वे आणि तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील, समीर येरुणकर आदी प्रमुख उपस्थित होते.

बुद्धिबळ आणि हॉलिबॉल स्पर्धेचे नियोजन तालुका पावसाळी महोत्सव समितीचे मालू गायकवाड, अंकित जोशी, जयवंत पारधी, नितीन सुपे, जगदीश जाधव, चव्हाण, अजय डाळिंबकर, जनार्दन पजई, स्वप्निल नामदास, म्हात्रे, सुप्रिया आदींकडून केले होते.

हॉलिबॉल स्पर्धेत १४ वर्षे गटातील मुलांमध्ये शारदा मंदिर डिकसळ प्रथम तर विद्या विकास नेरळ दुसरा आला. तर मुलींच्या गटात अभिनव शाळा कर्जत प्रथम तर नेरळ विद्या मंदिर शाळेच्या मुलींनी दुसरा क्रमांक पटकावला.



१७ वर्षाखालील मुले गटात पिंगळस शासकीय आदिवासी आश्रमशाळा प्रथम तर नेरळ विद्या मंदिर दुसरे आले. मुलींच्या गटात नेरळ विद्या मंदिर प्रथम तर विद्या विकास नेरळ दुसरे आले.

१९ वर्षाखालील गटात पिंगळस शासकीय आदिवासी आश्रमशाळा प्रथम आणि नेरळ विद्या मंदिर दुसरे आले तर याच वयोगटातील मुलींच्या गटात पिंगळस शासकीय आदिवासी आश्रमशाळा प्रथम तर नेरळ विद्या मंदिर दुसरे आले.

बुद्धिबळ स्पर्धेत कर्जत तालुक्यातील सर्व बीट मधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा रंगली. या स्पर्धेत प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांनी आप आपल्या गटात विजेतेपद मिळविले.

बुद्धिबळ स्पर्धा १४ वर्षे खालील, १७ वर्षे खालील आणि १९ वर्षे खालील गटात मुली आणि मुले अशी झाली. बुद्धिबळ १४ वर्षाखालील मुलांमध्ये शारदा मंदिर कर्जत येथील सार्थ लोभी तर मुलींच्या गटात शारदा मंदिर कर्जत शाळेची प्रेक्षा कापसे प्रथम आले.

१७ वर्षे खालील गटात मुलांमध्ये कर्जत एज्युकेशन सोसायटीचा साईराज लोहारे प्रथम आणि मुलींमध्ये शारदा मंदिर कर्जत शाळेची न्यानदा गुजराथी यांनी प्रथम क्रमांक पटकावले.

१९ वर्षाखालील गटात मुलांमध्ये ऑर्किड इंग्लिश मिडीयम स्कूल कशेळे येथील आदित्य सफळे याने तर मुलींच्या गटात ऑर्किड इंग्लिश मिडीयम स्कूल ची गोमजी कुंजीर प्रथम आली आहे.

## आदर्श पतसंस्थेतर्फे गणपती स्तोत्र स्पर्धा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे या वर्षी ५ ते १३ वर्षे वयोगट च्या मुला मुलींसाठी गणपती स्तोत्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्तोत्र म्हणण्याचा व्हीडीओ पाठविण्याची अंतिम तारीख २ सप्टेंबर आहे.



गणपती स्तोत्र स्पर्धे साठी प्रथम क्रमांक ५००० रुपये रोख, द्वितीय क्रमांक ३००० रोख, तृतीय क्रमांक २००० रोख अशी बक्षिसे देण्यात येणार आहे.

आदर्श भवन येथील मुख्य कार्यालयातील गणेशमूर्तीसमोर संस्थेच्या १९ शाखातील प्रत्येक शाखेला रतनजी टाटा यांच्या जीवन प्रवासावर एक एक विषय देऊन त्यांच्या कडून १९ विषयाची माहिती प्रिंट स्वरुपात मागविण्यात आली होती. ही माहिती आदर्श पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात गणेश मूर्तीच्यासमोर फ्रेम बनवून लावण्यात आली आहे. यातून रतनजी टाटा यांचा जीवन प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

आपल्या आदर्श पतसंस्थेतर्फे गणेशोत्सवानिमित्त खास रतन टाटा यांचा जीवन प्रवास ही थीम सादर करण्यात आली आहे. या निमित्ताने आपणास व आपल्या पाल्यास रतन टाटा यांनी आपले आयुष्य कसे घडविले आणि त्याचबरोबर देशाच्या विकासात कसा हातभार लावला हे जाणून घेण्याची सुवर्णसंधी लाभणार आहे. आपण आपल्या पाल्यासह रविवार वगळून सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत ही थीम पहाण्यासाठी व बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी अवश्य उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी केले आहे.

## ध्रुवीची बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये चमकदार कामगिरी!




**। रसायनी । राकेश खराडे ।**

योनेक्स सनराइज महाराष्ट्र मिनी स्टेट बॅडमिंटन चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत स्पंक शटलर्स बॅडमिंटन अकादमीची खेळाडू ध्रुवी कुलदीप कुंबेफळकर हिने उत्कृष्ट कामगिरी करत तीन पदके पटकावली आहेत.

मुली एकेरी गट-१३ मध्ये ध्रुवीने उपविजेतेपद मिळवले, तर मुली दुहेरी गट-१३ मध्ये कायरा रैना हिच्यासह विजेतेपद पटकावले. यासोबतच मिक्स डबल्स-१३ गटात खुश दीक्षित सोबत खेळताना विजेतेपदावर नाव कोरले. या उल्लेखनीय कामगिरीमुळे ध्रुवीने आपली बहुआयामी खेळाडू म्हणून छाप पाडली आहे. तिला मानसी गाडगीळ यांचे मार्गदर्शन मिळत आहे.तिच्या यशाबद्दल ध्रुवीवर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## कॅरीबियन लीगमध्ये एका चेंडूवर २२ धावा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सोमवारी रात्री कॅरीबियन प्रीमियर लीगमध्ये एका चेंडूवर २२ धावा झाल्या. ही घटना सेंट लुसिया ग्राउंडवर गयाना अमेझॉन वॉरियर्स आणि सेंट लुसिया किंग्ज यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्याची आहे.

नाणेफेक जिंकल्यानंतर, गयाना अमेझॉन वॉरियर्स प्रथम फलंदाजी करत होते. रोमारियो शेफर्ड आणि इफ्तिखार अहमद क्रीजवर होते. १५ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर २२ धावा झाल्या. ओशेन थॉमसने षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर नो बॉल टाकला. यावर फलंदाजाला आणखी धावा करता आल्या नाहीत. त्याने पुढचा चेंडू वाईड टाकला. त्यानंतर त्याने पुढच्या दोन चेंडूंवर नो बॉल टाकला. फलंदाज शेफर्डने या दोन्ही चेंडूंवर दोन षटकार मारले. थॉमसने पुढचा चेंडू योग्यरित्या टाकला. यावरही शेफर्डने षटकार मारला. अशाप्रकारे, तिसऱ्या चेंडूवर एकूण २२ धावा झाल्या. शेफर्डने ३४ चेंडूत नाबाद ७३ धावा केल्या. तथापि, सामना सेंट लुसिया किंग्जने ४ गडी राखून जिंकला.

सामन्यात गयाना वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करत ६ गडी गमावून २०२ धावा केल्या. सेंट लुसियाने १८.१ षटकांत ६ गडी गमावून लक्ष्य गाठले. गयानाकडून रोमारियो शेफर्डने ३४ चेंडूत नाबाद ७३ धावा केल्या. शाई होपने २३ धावा आणि बेन मॅकडर्मोटने ३० धावा केल्या. पाकिस्तानच्या इफ्तिखार खानने २७ चेंडूत ३३ धावा केल्या. केऑन गॅस्टनने २ बळी घेतले. २०३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, सेंट लुसिया किंग्जची सुरुवात खराब झाली आणि जॉन्सन चार्ल्स लवकर बाद झाला. सेफर्ट आणि ऑगस्टेने पॉवरप्लेमध्ये शानदार पुनरागमन केले.

## आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा

# गुरप्रीतला पहिले सुवर्णपदक

### ज्युनियर संघाने ४ पदके जिंकली; ८२ पदकांसह भारत अव्वल

**। श्यामकेंट । वृत्तसंस्था ।**

कझाकस्तानमधील श्यामकेंट येथे सुरू असलेल्या १६व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रिओ ऑलिंपियन गुरप्रीत सिंगने २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूलमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्याचा सहकारी अमनप्रीत सिंगने रौप्यपदक जिंकले. यासोबतच, दोघांनीही हर्ष गुप्तासोबत सांघिक सुवर्णपदक जिंकले, ज्यामध्ये त्यांचा एकत्रित स्कोअर १७०९ होता. यासह, भारताची पदकांची संख्या एकूण ८२ झाली आहे, ज्यामध्ये ४४ सुवर्ण, २० रौप्य आणि १८ कांस्य पदकांचा समावेश आहे. ३७ वर्षीय गुरप्रीत सिंगने त्याच्या कारकिर्दीतील पहिले आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक जिंकले. १२ वर्षांपूर्वी तेहरान येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत त्याने याच स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.



गुरप्रीत आणि अमनप्रीत दोघांनीही ५७२ चा समान स्कोअर केला, परंतु अमनप्रीतने गुरप्रीतच्या १८ च्या तुलनेत ११ इनर सर्कल शॉट्स मारले, ज्यामुळे गुरप्रीतला सुवर्णपदक मिळाले. या स्पर्धेत चीनच्या सु लियानबोफानने कांस्यपदक जिंकले.

पात्रता फेरीत नीरजने ५७० गुण मिळवले. अंतिम फेरीत, अनिश चौथ्या मालिकेपर्यंत आघाडीवर होता, जिथे तो २० पैकी फक्त २ लक्ष्य चुकवू शकला. पाचव्या मालिकेत, सूने परिपूर्ण ५ लक्ष्य ठोकून गुणांची बरोबरी केली, तर अनिशने एक लक्ष्य चुकवले.पुढील दोन मालिकांमध्येही अनिशने प्रत्येकी एक लक्ष्य चुकवले, ज्यामुळे सूला एका गुणाची आघाडी मिळाली. शेवटच्या मालिकेत, अनिशने प्रथम शॉट मारला आणि परिपूर्ण ५ मारले आणि दबाव निर्माण केला, परंतु सूने आपला संयम राखला.

### ५० मीटर पिस्तूलमध्ये सांघिक रौप्य पदक

५० मीटर पिस्तूल स्पर्धेत योगेश कुमार, अमनप्रीत सिंग, रविंदर सिंग यांनी रौप्य पदक जिंकले. योगेश यांनी ५४८, अमनप्रीत यांनी ५४३ आणि रविंदर सिंग यांनी ५४२ गुण मिळवले. तर ५० मीटर पिस्तूल ज्युनियरमध्ये संघाने सुवर्णपदक जिंकले. अभिनव चौधरी यांनी ५४१, उमेश चौधरी यांनी ५२९ आणि मुकेश नेलावल्ली यांनी ५२३ गुण मिळवून संघाला सुवर्णपदक जिंकून दिले.

### ज्युनियर ट्रॅप मिश्र स्पर्धेत रौप्य पदक

ज्युनियर मिक्स्ड टीम ट्रॅप स्पर्धेत, आर्यवंश त्यागी आणि भव्य त्रिपाठी या जोडीला सुवर्णपदकाच्या सामन्यात कझाकस्तानच्या निकिता मोइसेयेव आणि एलिओनोरा इब्रागिमोवा यांच्याकडून ३७-३८ असा पराभव पत्करावा लागला.

## अनधिकृत स्पर्धेत खेळणारे

# कबड्डी संघटनेच्या रडारवर

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पंचवटी स्टेडियम, नाशिक येथे हौशी फेडरेशन ऑफ महाराष्ट्र यांच्यावतीने २९ ते ३१ ऑगष्ट २०२५ या कालावधीत होणाऱ्या ३५व्या किशोर/किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत कोणत्याही संलग्न जिल्हा संघटनने सहभाग घेऊ नये. असे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने सर्व जिल्हा कबड्डी संघटनाना कळविले आहे.

उपरोक्त स्पर्धा आयोजन करणारी संस्था अखिल भारतीय हौशी कबड्डी महासंघ तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेला संलग्न नाही किंवा त्या संघटनेला भारतीय कबड्डी महासंघाने किंवा महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेने स्पर्धा आयोजनाची कोणतीही मान्यता अथवा परवानगी दिलेली नाही. त्यामुळे उपरोक्त कबड्डी स्पर्धा ही अनधिकृत व नियमबाह्य म्हणून घोषित करण्यात येत आहे.

त्यामुळे या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील कोणीही सहभागी होऊ नये. या अनधिकृत स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संलग्न संघटना, खेळाडू, पंच, क्रीडा कार्यकर्ते व आयोजक संस्था यांच्यावर महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्यावतीने कायमची बंदी घालण्यात येईल. सर्व संलग्न जिल्हा कबड्डी संघटनेने सदर स्पर्धेच्या अनधिकृत आयोजनाबाबत आपआपल्या जिल्ह्यात सामाजिक माध्यमाद्वारे जागृती करावी. त्याचे होणारे दुष्परिणाम याची सर्व घटकाना समज द्यावी.असे बाबूराव चांदेरे यांनी कळविले आहे.

### जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा | मिश्र दुहेरीत ध्रुव-तनिशा जोडीचा विजय

# पीव्ही सिंधूने उपांत्यपूर्व फेरीत गाठली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दुहेरी ऑलिंपिक पदक विजेती पीव्ही सिंधूने बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला आहे. गुरुवारी महिला एकेरीच्या १६ व्या फेरीच्या सामन्यात तिने चीनच्या वांग झीला सरळ गेममध्ये नॉकआउट केले. भारतीय जोडीला मिश्र दुहेरी स्पर्धेतही यश मिळाले. ऑलिंपिकमध्ये रौप्य आणि कांस्य पदके जिंकणाऱ्या सिंधूने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या वांग झीविरुद्ध आपले वर्चस्व कायम ठेवले.



सिंधूने पाचव्या हेड टू हेड सामन्यात तिसऱ्यांदा वांगचा पराभव केला. जागतिक क्रमवारीत १५ व्या क्रमांकाच्या सिंधूने पहिल्या गेममध्ये २१-१९ असा संघर्ष केल्यानंतर विजय मिळवला.पहिला गेम जिंकल्यानंतर, सिंधूने दुसऱ्या गेममध्येही आघाडी घेतली. तिने ही आघाडी कायम ठेवली आणि दुसरा गेम फरकाने जिंकून सामना जिंकला. क्वार्टर फायनलमध्ये सिंधूचा सामना जागतिक क्रमवारीत नंबर-१ दक्षिण कोरियाच्याआन से यंगशी होऊ शकतो.

जागतिक क्रमवारीत १६ व्या स्थानावर असलेल्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रिस्टो या भारतीय जोडीने १६ व्या स्थानावर असलेल्या अंतिम फेरीत ३ सामन्यात विजय मिळवला. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या हाँगकाँगच्या तांग चुन मिन आणि से यिंग सुत यांनी पहिल्या सामन्यात दोघांचा २१-१९ अशा फरकाने पराभव केला. दुसऱ्या सामन्यात ध्रुव-तनिषाने पुनरागमन केले आणि विजय मिळवत सामना बरोबरीत आणला. भारतीय जोडीने तिसरा सामना फरकाने जिंकला आणि क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला.

पुरुष एकेरीत भारताचे आव्हान संपुष्टात आले. बुधवारी रात्री उशिरा झालेल्या ३२ व्या फेरीत एचएस प्रणॉयला पराभवाचा सामना करावा लागला. त्याला जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाच्या डेन्मार्कच्या आंद्रेस अँटोनसेनकडून ३ सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला. आंद्रेसने पहिला गेम सहज जिंकला.

प्रणॉयने पुनरागमन केले आणि दुसरा गेम २१-१७ असा जिंकला आणि सामना बरोबरीत आणला. तिसऱ्या गेममध्ये दोघांमध्ये जोरदार लढत झाली आणि एका क्षणी गुण २१-२१ असा बरोबरीत आला. त्यानंतर अँटोनसेनने आक्रमक खेळ केला आणि तिसरा गेम २३-२१ असा जिंकला आणि सामना जिंकला. प्रणॉयच्या आधी, लक्ष्य सेनला राउंड ऑफ ६४ मध्ये जागतिक नंबर-१ खेळाडूकडून पराभव स्वीकारावा लागला.

## वेटलिफ्टिंगमध्ये भारताचे वर्चस्व

**। नवी दिल्ली । वृत्तसस्था ।**

अहमदाबाद येथे झालेल्या राष्ट्रकुल वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये देवी, मुथुपंडी राजा आणि स्नेहा सोरेन यांनी रौप्य पदके जिंकली.

त्याच वेळी, १७ वर्षीय कोयल बारने ५३ किलो वजनी गटात युवा विश्वविक्रमासह सुवर्णपदक जिंकले. वरिष्ठ गटात रौप्यपदक जिंकणाऱ्या स्नेहा सोरेनपेक्षा कोयल बारने जास्त वजन उचललेकोयल बारने महिलांच्या ५३ किलो युवा गटात इतिहास रचला. तिने एकूण १९२ किलो वजन उचलून एक नवा जागतिक युवा विक्रम रचला. हे वजन वरिष्ठ गटात रौप्य पदक जिंकणाऱ्या भारतीय वेटलिफ्टर स्नेहा सोरेनने उचललेल्या वजनापेक्षा जास्त आहे. कोयलने टोटल आणि क्लीन अँड जर्क दोन्ही प्रकारात नवीन विक्रम प्रस्थापित केले. या कामगिरीच्या जोरावर कोयलने युवा आणि कनिष्ठ दोन्ही प्रकारांचे विजेतेपद पटकावले.महिलांच्या ५८ किलो वजनी गटात, बिंदिया राणीने एकूण २०६ किलो वजन उचलून रौप्य पदक जिंकले. तिने स्नॅचमध्ये ८५ किलो, ८८ किलो आणि ९१ किलो वजन उचलले, तर क्लीन अँड जर्कमध्ये ११० किलो आणि ११५ किलो वजन उचलले. तथापि, शेवटच्या प्रयत्नात तिला १२२ किलो वजन उचलता आले नाही आणि ती रौप्य पदकावरच थांबली.या प्रकारात ऑस्ट्रेलियाच्या कियाना इलियटने २१२ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले.

बिंदिया राणीने यापूर्वी २०२२ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत ५५ किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकले आहे. तसेच, ती २०१९ मध्ये राष्ट्रकुल विजेती राहिली आहे आणि २०२१ मध्ये रौप्य पदक जिंकले आहे.पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात, भारताच्या मुथुपांडी राजाला फक्त एका किलोने सुवर्णपदक हुकले. त्याने एकूण २९६ किलो वजन उचलले, परंतु म लेशियाच्या मोहम्मद अझनील बिन बिदिनने २९७ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले. पापुआ न्यू गिनीच्या मोरिया बारूने २९२ किलो वजन उचलून कांस्यपदक जिंकले. महिलांच्या ५३ किलो वजनी गटात, नायजेरियाच्या ओमोलोला ओनोम दिधीने १९७ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकले. भारताच्या स्नेहा सोरेनने १८५ किलो वजन उचलून रौप्यपदक जिंकले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)